१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, सोमवार १५ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०२, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 102 Marathi - Daily - Mumbai, 15 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in

Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

मुंबईत 'पांढऱ्या पट्ट्यांवरून' का पेटलाय वाद?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### काश्मीरची ३० टक्के सफरचंद खराब! ४०० कोटींचे नुकसान

**श्रीनगर** - काश्मीरमध्ये गेल्या महिनाभरात सातवेळा झालेल्या गारपिटीमुळे आणि वादळी पावसामुळे सफरचंद उत्पादकांना मोठा फटका बसला असून, सुमारे ३० टक्के सफरचंद पीक नष्ट झाले आहे. यामुळे सुमारे ७ लाख मेट्रिक टन सफरचंद खराब झाले असून, सफरचंद उद्योगाला ३०० ते ४०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या संकटाचा फटका सफरचंद व्यवसायाशी संबंधित सुमारे १२ लाख लोकांना बसला आहे. एका शेतकऱ्याने म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी शेतकरी क्रेडिट कार्डच्या माध्यमातून दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले आहे. खत उधारीवर खरेदी केले, पीक नष्ट झाल्यानंतर आम्ही पूर्णपणे खचून गेलो आहोत. आयुष्यात प्रथमच इतकी असहाय्यता जाणवत आहे की, आत्महत्येचे विचार मनात येत आहेत. यंदा हंगामात पाच ते सहा वेळा गारपीट झाली. आता ही सफरचंदे बी किंवा सी श्रेणीतही विक्रीयोग्य राहिलेली नाहीत.

### कॉकरोच पार्टीला परवानगी नाकारली

**जयपूर** - राजस्थानच्या जयपूर शहरात नियोजित आंदोलनासाठी कॉकरोच जनता पार्टीला पोलिसांनी परवानगी नाकारली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे कारण देत जयपूर पोलिसांनी हा निर्णय घेतला. सीजेपीने १५ जून रोजी एमआय रोडवरील शहीद स्मारक येथे धरणे आंदोलनाची परवानगी मागितली होती. जयपूर दक्षिण विभागाचे पोलीस उपायुक्त राजर्षी राज वर्मा यांनी पक्षाचे संयोजक शशी मीणा यांना पत्र पाठवून परवानगी देणे शक्य नसल्याचे कळवले. या निर्णयावर सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रंका यांनी आंदोलनाच्या केवळ एक दिवस आधी परवानगी नाकारल्याबद्दल प्रश्न उपस्थित करत, देशभरात शांततापूर्ण आंदोलने होत असताना राजस्थान पोलिसांना नेमकी कशाची भीती वाटली? असा सवाल केला.

# मातोश्रीवर बैठक! सर्व खासदार उपस्थित?

## संजय राऊतांचा दावा! मात्र नेत्यांच्या वक्तव्यांत विसंगती





**शिंदे सेना येत्या आठ दिवसांत 'ऑपरेशन टायगर' करून उबाठाचे ७ खासदार फोडणार या चर्चेने राजकीय वातावरण तापले असताना उद्धव ठाकरे यांनी आज मातोश्रीवर खासदारांची तातडीची बैठक बोलावली. या बैठकीला काही खासदार प्रत्यक्ष उपस्थित राहिले, तर काहींनी ऑनलाईन सहभाग नोंदवला. या बैठकीला सर्व खासदार उपस्थित होते, असा दावा संजय राऊत यांनी केला. मात्र इतर नेत्यांनी विसंगत उत्तरे दिल्याने उपस्थितबाबत संशय निर्माण झाला आहे. उबाठाचे लोकसभेत ९ आणि राज्यसभेत संजय राऊत असे एकूण १० खासदार आहेत.**

■ मुंबई


**उपमुख्यमंत्री** एकनाथ शिंदे ७ जून रोजी दिल्ली दौऱ्यावर असताना उबाठाच्या सात खासदारांनी त्यांची गुप्त भेट घेतली होती. या भेटीनंतर 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना उधाण आले असून, संभाव्य फुटीच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर खासदारांची तातडीची बैठक बोलावली. ही बैठक उद्धव ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत पार पडली. बैठकीला खासदार अरविंद सावंत, खासदार अनिल देसाई, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे आणि राज्यसभेचे खासदार संजय राऊत हे चार खासदार प्रत्यक्ष मातोश्रीवर उपस्थित होते. खासदार संजय देशमुख, खासदार नागेश पाटील-आष्टीकर, खासदार ओमराजे निंबाळकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि परभणीचे खासदार संजय जाधव हे पाच खासदार ऑनलाईन सहभागी झाले, असा दावा करण्यात आला. ईशान्य मुंबईचे खासदार संजय दीना पाटील यांच्या गाडीचा किरकोळ अपघात झाल्यामुळे ते बैठक सुरू झाल्यानंतर सुमारे एका तासाने दाखल झाले. माजी खासदार विनायक राऊतही उपस्थित होते.

परभणीचे खासदार संजय जाधव आणि शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे हे सुरुवातीला 'नॉट रिचेबल' असल्याची चर्चा होती. खासदारकी मिळत नसल्याने संजय जाधव हे गेला काही काळ नाराज आहेत आणि ही नाराजी ते उघडपणे बोलून दाखवत आहेत. आजही संजय जाधव हे मुंबईला न येता परभणीतील 'धोंडे' कार्यक्रमात उपस्थित राहिले. त्यांचा तेथील व्हिडिओ व्हायरल झाला, ज्यामुळे राजकीय वातावरण अधिकच तापले. मात्र, संजय राऊत यांनी बैठकीनंतर स्पष्ट केले की, वाकचौरे व जाधव बैठकीला ऑनलाईन उपस्थित होते. परंतु याबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

बैठकीनंतर संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला खासदार अरविंद सावंत, संजय दिना पाटील, अनिल देसाई आणि नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हे प्रत्यक्ष उपस्थित होते. उर्वरित पाच खासदारांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग नोंदवला. ओमराजे निंबाळकर यांचे चिरंजीव पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचार घेत असून, त्या ठिकाणाहून त्यांनी ऑनलाईन सहभाग घेतला. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पत्नी आजारी असल्याने ते शिर्डीतील रुग्णालयातून बैठकीत सहभागी झाले. (अनिल देसाई यांनी मात्र म्हटले की वाकचौरे यांच्या पत्नी हैदराबाद येथे उपचार घेत आहेत.) नागेश पाटील आष्टीकर यांचे चिरंजीव विधान परिषदेच्या निवडणुकीत उमेदवार असल्याने ते प्रचारात व्यस्त होते,

पान ७ वर

## ओमानजवळ भारतीयांची नौका बुडाली! १४ जण बचावले



**ओमानमधील रास अल हद्द किनाऱ्यापासून सुमारे ८० नॉटिकल मैलांवर भारतीय नागरिकांना घेऊन जाणारी एमएसव्ही विराट-१ ही पारंपरिक नौका समुद्रात बुडाल्याची घटना आज घडली. मात्र, वेळेवर बचाव केल्याने नौकेतील सर्व १४ भारतीयांना सुरक्षितपणे लाईफ राफ्ट म्हणजेच जीवनरक्षक नौकेत स्थलांतरित करण्यात आले. या मदत मोहिमेत अमेरिकन नौदल, भारतीय नौदल आणि जवळून जात असलेल्या एका व्यापारी जहाजाने संयुक्तपणे सहभाग घेतला.**

■ मस्कत

**१४ जून** रोजी सकाळी अमेरिकन नौदलाला भारतीय नागरिकांना घेऊन जाणारी नौका संकटात सापडल्याची आणि बुडण्याचा धोका निर्माण झाल्याची माहिती मिळाली. त्यानंतर अमेरिकन नौदलाने तातडीने ओमानमधील संबंधित अधिकाऱ्यांना तसेच भारतीय नौदलाला सतर्क केले. अमेरिकन नौदलाच्या पी-८ सागरी गस्ती विमानाने घटनास्थळी पोहोचून समुद्रात जीवनरक्षक नौका सोडली. त्यानंतर नौकेवरील सर्व १४ भारतीयांना सुरक्षितपणे त्या लाईफ राफ्टमध्ये हलविण्यात आले. याचबरोबर भारतीय नौदलाची जहाजेही अतिरिक्त मदतीसाठी घटनास्थळाकडे रवाना करण्यात आली. बचाव मोहिमेत एमव्ही जबल अली-९ या व्यापारी जहाजानेही महत्त्वाची भूमिका बजावली. सेंट किट्स अँड नेव्हिसचा ध्वज असलेले हे जहाज सोहारहून मुंबईकडे जात होते. घटनेच्या ठिकाणाजवळ असल्याने अमेरिकन पी-८ विमानाने या जहाजाला मदतीचे आवाहन केले. त्यानंतर जहाजाने तातडीने आपला मार्ग बदलून बचाव कार्यात सहभाग घेतला. सर्व १४ भारतीय सुरक्षितपणे जीवनरक्षक नौकेत पोहोचल्याचा दुजोरा याच व्यापारी जहाजामार्फत मिळाला. त्यामुळे बचाव यंत्रणांना परिस्थितीची अचूक माहिती

पान ७ वर

## मंत्री महाजनांच्या भेटीनंतर तिसऱ्या दिवशी रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन मागे

■ पंढरपूर

**शेतकऱ्यांना** सरसकट कर्जमाफी मिळण्याबाबत शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज रात्री तिसऱ्या दिवशी अन्नत्याग आंदोलन मागे घेतले. मंत्री गिरीष महाजन यांनी रात्री उशिरा आंदोलनस्थळी त्यांची भेट घेतली. त्यांच्यासोबत झालेल्या दीर्घ चर्चेनंतर २२ जूनच्या आधी मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याचे आश्वासन मिळाल्याने रोहित पवारांनी आपल्या आंदोलनाची तलवार म्यान केली.

चर्चेनंतर रोहित पवार म्हणाले की, शेतकऱ्यांना कर्जमाफी केल्यामुळे मी सरकारचे आभार मानतो. मात्र कर्जमाफीच्या जीआरमध्ये दोन जाचक अटी आहेत. त्या अटी रद्द करून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी. नाहीतर ३६ लाख शेतकऱ्यांचे नुकसान होईल. त्यानंतर गिरीष महाजनांनी सांगितले की, सरकार शेतकऱ्यांबाबत सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना वेळोवेळी मदत केली आहे. आज तर आपण निर्णय घेऊ शकत नाही. अधिवेशनाच्या आधी म्हणजेच २२ जूनच्या आधी मागण्यांबाबत मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेऊन चर्चा करूया. या बैठकीत मुख्यमंत्री जो निर्णय घेतील तो आपल्याला मान्य करावा लागेल. रोहित पवारांनी आपले आंदोलन मागे घ्यावे, अशी माझी विनंती आहे. त्यानंतर रोहित पवारांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत ठोस निर्णय झाला नाहीतर आम्ही ४ जुलैला मराठवाड्यात शेतकऱ्यांसाठी आंदोलन करणार आहे.

दरम्यान, आज दुपारी आंदोलनस्थळी मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी पोहोचून रोहित पवारांची भेट घेतली होती.

## पंढरपूरजवळ पिकअप गाडी विहिरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू

■ पंढरपूर

**म्हसवड-पंढरपूर** मार्गावर पिकअप गाडी विहिरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू झाला असून, ६ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेने एकच हळहळ व्यक्त होत आहे. हा अपघात माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावानजीक झाला. मृत झालेले सर्व भाविक पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी होते. मृतांच्या नातेवाईकांना सरकारने ५ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली.

हे सर्व भाविक म्हसवड येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन आपल्या गावाकडे परतत असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप गाडी थेट रस्त्या कडेला असलेल्या विहिरीत कोसळली. ही विहीर काटोकाट पाण्याने भरलेली होती. या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाकडून मदत आणि बचावकार्य वेगाने सुरू करण्यात आले. मात्र तोपर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला. ३ एप्रिल रोजी दिंडोरीत अशी एक घटना घडली होती. एका विहिरीत गाडी कोसळून एकाच कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू झाला होता.

## वाहनांमध्ये १०० टक्के इथेनॉल नितीन गडकरी यांची मंजुरी

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी वाहनांमध्ये १०० टक्के इथेनॉल वापरण्यास कायदेशीर मान्यता देणाऱ्या नियमावलीला अंतिम मंजुरी दिली. नितीन गडकरी म्हणाले की, १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांसाठी आवश्यक नियम निश्चित करणाऱ्या फाईलवर मी स्वाक्षरी केली आहे. त्यामुळे आता अशा वाहनांच्या वापराचा मार्ग मोकळा झाला आहे. गडकरी यांच्या दोन्ही मुलांचे इथेनॉल उत्पादनाचे कारखाने असल्याने त्यांच्या उद्देशावर कायम संशय घेतला जातो.

टोयोटा, सुझुकी, एमजी मोटर, ह्युंदाई यांसारख्या वाहन उत्पादक कंपन्या येत्या दीड महिन्याच्या आत १०० टक्के इथेनॉल-सुसंगत वाहने बाजारात आणतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यापूर्वी या महिन्याच्या सुरुवातीला दिल्लीमध्ये ८५ टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल ई-८५ आले होते. गडकरी म्हणाले की, मी १०० टक्के इथेनॉलचे स्वप्न मांडत होतो तेव्हा अनेक जण मला हसायचे. काही मित्रांनी तर टीकाही केली होती. मात्र रात्री ८ वाजता मी १०० टक्के इथेनॉलच्या वापराला कायदेशीर मान्यता देणाऱ्या नियमावलीच्या अंतिम फाईलवर स्वाक्षरी केली. आता इथेनॉल हा पेट्रोलचा प्रभावी पर्याय ठरू शकतो.

## विश्वचषकात भारताची विजयी सलामी दीप्ती शर्माच्या फिरकीपुढे पाकिस्तान गारद



■ बर्मिंगहॅम

**स्मृती** मंधानाच्या ६८ धावा आणि दीप्ती शर्मा (५ गडी), श्री चरणी (३ गडी) यांच्या अफलातून फिरकीच्या जोरावर आज भारतीय महिला संघाने पाकिस्तानला ६४ धावांनी पराभूत करून विजयी सलामी दिली. बर्मिंगहॅममध्ये झालेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या सहाव्या सामन्यात भारताने पाकिस्तानसमोर विजयासाठी १७० धावांचे आव्हान दिले होते. मात्र ते पाकिस्तानी फलंदाजांना पेलवले नाही आणि संपूर्ण संघाला १०६ धावा करता आल्याने विश्वचषकातील पहिला पराभव पत्करावा लागला.

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारताची सुरुवात चांगली झाली नाही. पाकिस्तानी गोलंदाज सादिया इक्बालच्या पहिल्याच षटकात

पान ४ वर

## बंड शमल्यानंतरही महायुतीला धास्ती नगरसेवक ठाण्याच्या हॉटेलात मुक्कामी

■ ठाणे

**नाशिक** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने आपल्या नगरसेवकांना ठाण्यातील एका हॉटेलमध्ये मुक्कामासाठी हलवले आहे. निवडणुकीपूर्वी कोणत्याही प्रकारचा घोडेबाजार होऊ नये आणि मतदार एकत्र राहावेत यासाठी ही रणनीती आखण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बंडखोरीच्या राजकारणानंतर नाशिकमध्ये आता या 'हॉटेल पॉलिटिक्स'ची जोरदार चर्चा रंगली आहे.

महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांनी आपल्या समर्थक मतदारांना पुढील चार दिवसांसाठी ठाण्यात आणले आहे. कल्याण रोड परिसरातील एका हॉटेलमध्ये हे नगरसेवक आणि पदाधिकारी मुक्कामी असून, निवडणुकीपर्यंत ते याच ठिकाणी राहणार असल्याची माहिती आहे.

नाशिक विधान परिषद निवडणुकीत उमेदवारीवरून निर्माण झालेला तिढा काही दिवसांपूर्वी चर्चेचा विषय ठरला होता. महायुतीमध्ये बंडखोरीची चिन्हे दिसत असताना राज्याचे मंत्री गिरीश महाजन आणि उदय सामंत यांनी मध्यस्थी करत विविध स्तरांवर चर्चा केली. त्यानंतर गोकुळ गीते आणि प्रसाद हिरे यांनी माघार घेतल्याने नरेंद्र दराडे यांचा मार्ग मोकळा झाला.

## पतंजली सिव्हिल सर्व्हिसेस आता सिव्हिल सर्व्हिस अकादमी सुरू होणार

**पतंजलीने भारतीय संस्कृती, आधुनिक विज्ञान आणि राष्ट्रसेवेच्या भावनेवर आधारित आयएएस, आयपीएस तसेच इतर केंद्रीय सेवांतील अधिकारी घडविण्याच्या उद्देशाने पतंजली सिव्हिल सर्व्हिसेस अकादमी सुरू करण्याची घोषणा केली आहे. प्राचीन भारतीय ज्ञान आणि आधुनिक प्रशासकीय गरजांचा समन्वय साधून भारताच्या प्रशासन व्यवस्थेला नवी दिशा देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.**

■ हरिद्वार

**ही अकादमी** केवळ यशस्वी नागरी सेवक घडविण्यावरच भर देणार नाही, तर देशसेवेला



सर्वोच्च कर्तव्य मानणारे राष्ट्राभिमानी नागरिक तयार करण्यासाठीही कार्य करणार आहे. दीर्घकालीन उद्दिष्ट म्हणून एक कोटी समर्पित नागरिक घडविण्याचे लक्ष्य अकादमीने निश्चित केले आहे. योगगुरू रामदेव बाबा यांनी या अकादमीचे वर्णन शिक्षण क्षेत्रातील ऐतिहासिक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

योगदान असे केले. भारताचे शासन संविधानानुसार चालते. मात्र कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या चारित्र्यावर अवलंबून

पान ७ वर

## भारत आता केवळ ग्राहक नाही तर जगाला उपाय देणारा देश

■ नाइस (फ्रान्स)

**भारत** आता इतरांनी विकसित केलेल्या उपाययोजनांचा केवळ ग्राहक राहिलेला नाही, तर जगासमोरील मोठ्या आव्हानांवर उपाय सुचवणारा आणि योगदान देणारा देश बनला आहे, असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फ्रान्समधील नाईस येथे आयोजित 'भारत इनोव्हेट्स' कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी दिला.

राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्तपणे 'भारत इनोव्हेट्स' कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यावेळी बोलताना मोदी यांनी भारत-फ्रान्स संबंधांचे विशेष महत्त्व स्पष्ट करून ते म्हणाले की, भारत आणि फ्रान्स यांच्यातील भागीदारी ही केवळ संबंधांची नसून

**फ्रान्समधून मोदींचा संदेश**

विश्वास, नवकल्पना, प्रेरणा आणि सामायिक दृष्टिकोनावर आधारित आहे. भारतातील युवा नवउद्योजक संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी उपाय शोधत आहेत भारतासोबत सहकार्य करा

पान ७ वर

## घाटकोपर-दादरनंतर गिरगावात पांढरे पट्टे! मनसे-गिरगांवकर संतप्त

■ मुंबई

**घाटकोपरमध्ये** सुरू झालेला पांढऱ्या पट्ट्यांचा वाद दादरनंतर आता गिरगाव परिसरात पोहोचला आहे. गिरगाव चौपाटी परिसरातील सुखसागर सोसायटीसमोरील फुटपाथवर आज पांढरे पट्टे आढळल्याने तणाव निर्माण झाला. पालिकेने या पट्ट्यांवर काळा रंग दिला आणि वातावरण निवळण्याचा प्रयत्न केला.

मनसेचे विभाग अध्यक्ष दिनेश पुंडे यांनी या प्रकरणी आंदोलनाचा इशारा दिला आहे. मनसे आणि आम्ही गिरगांवकर संघटनेचे कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी या पट्ट्यांवर काळा रंग फासण्यास



सुरुवात केली असताना गावदेवी पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पालिकेने काळा रंग फासला. मुंबईतील सार्वजनिक रस्ते आणि फुटपाथवर धार्मिक कारणांसाठी काढल्या जाणाऱ्या पांढऱ्या पट्ट्यांवरून वादाला तोंड फुटले असून मनसे, जैन समाज, स्थानिक संघटना आणि प्रशासन यांच्यातील संघर्ष अधिकच तीव्र होत आहे.

मनसे नेते संदीप देशपांडे यांनी आज म्हटले की, घाटकोपर आणि दादरमध्ये पट्ट्या मारणाऱ्यांनीच मुंब्रा-पायधुनी परिसरात जाऊन अशा पट्ट्या मारून दाखवाव्यात. आम्ही आंदोलन करून दाखवले आहे, आता त्यांनी त्यांची हिंमत दाखवावी. धर्म हा चार

पान ७ वर

# राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून पुण्यात पावसासाठी पर्जन्ययाग

## धार्मिक विधीद्वारे वरुणराजाला साकडे

■ पुणे

**राज्यातील** अनेक भागांमध्ये पावसाने अद्याप हजेरी लावलेली नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. अनेक ठिकाणी पाणीटंचाईचे संकटही गडद होत आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात पाऊस लवकर यावा आणि राज्यावरील जलसंकट दूर व्हावे, यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून पर्जन्ययागाचे आयोजन करण्यात आले. विघ्नहर्ता गणपती मंदिरात झालेल्या या धार्मिक विधीद्वारे वरुणराजाला साकडे घालण्यात आले. आयोजक सुरज लोखंडे यांनी सांगितले की, जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला असतानाही अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या असून, भविष्यात मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक शहरांमध्ये पाणी कपात सुरू असल्याने सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा फटका बसत आहे. या संकटातून राज्याची सुटका व्हावी आणि भरपूर पाऊस पडावा अशी प्रार्थना यज्ञाद्वारे करण्यात आली.

याग करणाऱ्या पुरोहितांनी सांगितले की, हवामानातील बदल आणि अल निनोच्या प्रभावामुळे पावसावर परिणाम होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अधिक महिन्यातील अमावस्या ही विष्णू भक्तांसाठी विशेष महत्त्वाची मानली जाते. त्यानिमित्ताने विष्णू यागासह प्रजन्य यागाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी दोन-तृतीयांश बहुमत आवश्यकच

## गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्षाला कोर्टाचा दिलासा

■ मुंबई

**सहकारी** गृहनिर्माण संस्थेत अविश्वास ठराव मंजूर होण्यासाठी बैठकीला उपस्थित आणि मतदानाचा हक्क असलेल्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश बहुमत असणे आवश्यकच आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने गोरेगाव येथील सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रकरणात दिला. संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीमधील अंतर्गत वादावर हा निर्णय देत न्यायालयाने अध्यक्षाविरोधातील अविश्वास ठराव बेकायदेशीर ठरवून रद्द केला.

गोरेगाव (पूर्व) येथील 'पद्मावती नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' या संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास २०१२ पासून रखडला होता. विकासकाने काम न केल्यामुळे संस्थेच्या सर्वसाधारण सभेने विकासकाचा करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, या दरम्यान व्यवस्थापकीय समितीमधील ६ सदस्यांनी तत्कालीन अध्यक्षांविरुद्ध अविश्वास ठराव आणण्यासाठी उपनिबंधकांकडे मागणी केली. १५ एप्रिल रोजी झालेल्या विशेष बैठकीत ६ विरुद्ध ३ मतांनी अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला आणि उपनिबंधकांनी अध्यक्षांचे पद रिक्त झाल्याचे घोषित केले. या कारवाईविरोधात माजी अध्यक्षा माधवी गोसावी व नवनिर्वाचित समिती सदस्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने निर्णय दिला. अविश्वास ठरावाची नोटीस काढण्यात आली तेव्हा समितीत ९ सदस्य होते. मात्र, प्रत्यक्ष बैठक होण्यापूर्वी १२ एप्रिल २०२६ रोजी संस्थेने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून १० व्या सदस्याची नियुक्ती केली होती. या नवीन सदस्याला अविश्वास ठरावाच्या बैठकीची कोणतीही नोटीस देण्यात आली नाही आणि मतदानापासून वंचित ठेवण्यात आले.

# पाणी कमी झाल्याने जलाशयातील बुडालेले मंदिर दिसू लागले

■ मांड्या

**कर्नाटकातील** कृष्णराजसागर जलाशयाच्या पाण्याखाली अनेक वर्षे बुडालेल्या शतकांपूर्वीचे लक्ष्मीनारायण स्वामी मंदिर पुन्हा एकदा पाण्याबाहेर दिसू लागले आहेत. हे मंदिर पाहायला पर्यटक, छायाचित्रकार आणि इतिहासप्रेमी गर्दी करत आहे.

जुन्या म्हैसूर प्रदेशाची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या या केआरएस धरणातील पाणीसाठा यंदा कावेरी खोऱ्यातील अपुऱ्या पावसामुळे लक्षणीय कमी झाला आहे. सध्या जलाशयाची पाणीपातळी सुमारे ८१ फूटांवर आली असून, वर्षभर पाण्याखाली असणारे अनेक भाग आता उघडे पडले आहेत. यामध्ये मांड्या जिल्ह्यातील बोरेंदूर गावाजवळील ऐतिहासिक लक्ष्मीनारायण स्वामी मंदिराचाही समावेश आहे.

# राहुल गांधींच्या वाढदिवसानिमित्त रील से रियल तक स्पर्धेचे आयोजन

■ मुंबई

**लोकसभेतील** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा १९ जूनला वाढदिवस असल्याने मुंबई प्रदेश युवक काँग्रेसतर्फे 'रील से रियल तक' या विशेष रील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक आणि जनहिताच्या प्रश्नांवर युवकांनी आपली मते प्रभावीपणे मांडावीत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी बेरोजगारी, पेपरफुटी आणि महागाई हे तीन महत्त्वाचे विषय निश्चित करण्यात आले आहेत. सहभागी स्पर्धकांनी यापैकी कोणत्याही एका विषयावर आपले मत, अनुभव किंवा भूमिका मांडणारी रील तयार करून सादर करायची आहे. स्पर्धकांनी तयार केलेली रील १७ जून २०२६ पर्यंत आपल्या इन्स्टाग्राम खात्यावर पोस्ट करणे आवश्यक आहे. रीलमधील चित्रफीत आणि आवाज स्पष्ट असावा. तसेच कोणतीही आक्षेपार्ह, अश्लील किंवा अपमानास्पद भाषा वापरू नये, असे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.



स्पर्धेतील उत्कृष्ट तीन रील्सना रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

प्रथम क्रमांकासाठी ११ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ५ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी ३ हजार रुपये अशी पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. देशातील वाढती बेरोजगारी, महागाई आणि पेपरफुटीसारख्या गंभीर प्रश्नांवर युवकांनी आपली भूमिका ठामपणे मांडावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# जोतिबा डोंगरावर दहशत! दोघे ताब्यात

■ कोल्हापूर

**जोतिबा** डोंगर परिसरात दोन जणांनी हातात कोयता घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर कोडोली पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, पोलिसांच्या कारवाईनंतर संबंधित दोन्ही तरुणांनी आपल्या कृत्याबद्दल माफी मागितली असून, अशा प्रकारची चूक पुन्हा न करण्याचे आश्वासन दिले आहे.

# 'सोनी'च्या सर्व वाहिन्यांचे टीव्हीवरील प्रक्षेपण बंद

■ मुंबई

**सोनी** पिक्चर्स नेटवर्क्स इंडियाच्या सोनी मराठीसह सर्व वाहिन्या जीटीपीएल हॅथवे, डेन नेटवर्क्स आणि हॅथवे केबल अँड डेटाकॉम या प्लॅटफॉर्मवरून बंद केल्या आहेत. केबल कंपनी आणि सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडिया यांच्यातील वितरण करारासंदर्भातील वादामुळे सोनी नेटवर्कच्या वाहिन्या बंद करण्यात आल्याचे समजते.

गेल्या दोन दिवसांपासून टीव्हीवर दिसणे बंद झाले आहे. सोनी वाहिनी सुरू केल्यावर 'प्रिय ग्राहकांनो, प्रसारकाकडून वाहिनीच्या किमतीत करण्यात येणाऱ्या वाढीच्या निषेधार्थ आम्ही त्यांच्यासोबतचा करार अमलात आणलेला नाही. परिणामी संबंधित वाहिनी प्रसारणाने बंद केली आहे', असा संदेश पाहायला मिळत आहे. टीव्हीवरील प्रक्षेपण बंद असण्याबाबत अद्याप सोनी वाहिनीकडून अधिकृत वक्तव्य करण्यात आलेले नाही. दरम्यान, हिंदी जनरल एंटरटेनमेंट चॅनेल्सची लोकप्रियता वाढली असतानाही संबंधित ऑपरेटरकडून मिळणारे सबस्क्रिप्शन शुल्क मागील वर्षाच्या तुलनेत कमी असल्याचे सोनीचे म्हणणे आहे.

# देहूतील इंद्रायणीत मृत माशांचा खच आषाढीच्या तोंडावर नदी प्रदूषित

■ देहू



**वारकरी** संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेल्या देहूनगरीतील इंद्रायणी नदीत पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून आले आहेत. नदीच्या पाण्यावर मृत माशांचे थर तरंगताना दिसत असून, परिसरात दुर्गंधी पसरली आहे. या प्रकारामुळे वारकरी भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आषाढी वारी अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असताना नदीतील ही स्थिती चिंताजनक मानली जात आहे. रसायनमिश्रित सांडपाणी आणि मैलापाणी नदीत सोडले जात असल्यामुळेच पाणी दूषित होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. यापूर्वीही अशा घटना घडल्या असून, कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी पाठबंधारे विभाग, देहू नगरपंचायत व संबंधित ठेकेदारांवर बोट दाखवले जात आहे. भामा-आसखेड धरणाच्या पाईपलाईनसाठी पाणी अडविण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे. दरम्यान, या गंभीर प्रकारावर प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जातील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोक गुटखा खातात म्हणून विकतात मंत्री संजय सावकारेंचे अजब विधान

■ मुंबई

**राज्यात** गुटखा आणि तंबाखूच्या अवैध व्यापाराविरोधात कठोर कारवाईची तयारी सुरू असताना मंत्री संजय सावकारे यांच्या वक्तव्याने नवा वाद निर्माण झाला आहे. लोक तंबाखू खातात म्हणून विक्रेते गुटखा-तंबाखू विकतात. लोकांनी तंबाखू खाणे बंद केले तर विक्रीही थांबेल,त्यांनी म्हटले. अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुटखा विक्रीच्या अवैध साखळीत सहभागी असलेल्या टोळ्यांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र या निर्णयावर प्रतिक्रिया देताना सावकारे यांनी वेगळी भूमिका मांडली. मुंबईसह राज्यातील विविध भागांत मोठ्या प्रमाणावर गुटखा आणि प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात येत आहे.

# पालिकेचे ड्रेनेजचे झाकण चोरणारे आरोपी निर्दोष मुक्त

## चार वर्षांनंतर तुरुंगातून सुटका

■ मुंबई

**पालिकेच्या** गटार लाईनवरील लोखंडी ड्रेनेजचे झाकण चोरणाऱ्या चौघांची चार वर्षांनंतर निर्दोष मुक्तता झाली. ड्रेनेजचे झाकण आणि शिडी चोरतानाचा पुरावा सीसीटीव्ही फुटेजमधून पुढे आला नाही. यातील सरकारी पक्षाचे अपयश अधोरेखित करून अतिरिक्त सत्र न्यायाधीश महेश के. जाधव यांनी चारही आरोपींच्या निर्दोष मुक्ततेचे आदेश दिले. त्यानुसार आरोपी चार वर्षांनंतर तुरुंगातून बाहेर येणार आहेत.

ताडदेव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कथित जबरी चोरीची घटना घडली होती. याप्रकरणी मुंबई महापालिकेचे कर्मचारी संतोष शिंदे यांनी ३० मे २०२२ रोजी ताडदेव पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. त्यांच्या तक्रारीनुसार २९ मे २०२२ रोजी रात्री शिंदे हे तुळशीवाडी ड्रेनेज चौकी येथे ड्युटीवर असताना आरोपी रोहित वाघरी आणि त्याच्या इतर साथीदारांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून मारहाण केली. त्याचदरम्यान त्यांनी पालिकेचे सुमारे ३०,००० रुपयांचे लोखंडी ड्रेनेजचे झाकण व शिडी चोरून नेली. संबंधित तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून अकबरी अब्दुल रजाक शेख, नसीम मतिउल्ला खान, रोहित अंकुश वाघरी आणि अमन बाबू शेख या चौघांना अटक केली होती. या प्रकरणाचा निर्णय देताना न्यायालयाने सरकारी पक्षाच्या तपासातील त्रुटींवर बोट ठेवले. तक्रारदार घटनेच्या वेळी ड्युटीवर होते की नाही, याचा कोणताही बायोमेट्रिक किंवा हजेरीचा पुरावा पोलिसांनी गोळा केला नाही. तसेच घटनास्थळावरून गोळा केलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपींचा कोणताही सहभाग दिसून आला नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने आरोपींच्या निर्दोष सुटकेचे आदेश दिले.

# आरटीई प्रवेशासाठी १९ जूनपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई

**राज्यातील** शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा देत शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रियेसाठी १९ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी यासंदर्भात सूचना जारी केली असून, ही मुदतवाढ अंतिम असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

यंदा आरटीई प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. राज्यातील ८,७०१ खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये १ लाख १४ हजार ८२६ जागा उपलब्ध असून, त्यासाठी २ लाख ८९ हजार २८६ अर्ज प्राप्त झाले आहेत. पहिल्या फेरीत २०,७९६ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. त्यापैकी १२,९३९ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. तर दुसऱ्या फेरीत ५,७०४ अर्जांची निवड करण्यात आली असून, १३ जूनपर्यंत २,८५७ विद्यार्थ्यांचे प्रवेश पूर्ण झाले आहेत. पहिल्या फेरीच्या तुलनेत दुसऱ्या फेरीत निवड व प्रवेशांची संख्या कमी असल्याचे दिसून येत आहे.

# पत्नीसह २ मुलींना विहिरीत ढकलून पतीचीही आत्महत्या

■ वाशिम

**मालेगाव** तालुक्यातील तिवळी गावात पत्नीसह दोन मुलींना हात बांधून विहिरीत ढकललेल्या पतीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. एकाच कुटुंबातील चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने संपूर्ण तिवळी गाव हळहळत आहे. त्यांच्या मृत्युमागील नेमके कारण अद्याप उघड झालेले नाही.

काही कौटुंबिक वादातून ३५ वर्षीय संतोष बकाल यांनी आपल्या २८ वर्षीय पत्नी इंद्रायणी बकाल आणि ७ वर्षीय जान्हवी बकालसह ५ वर्षीय मुलगा सोहम बकाल यांना विहिरीत ढकलले. त्यानंतर स्वतः संतोष बकालने महावितरणच्या

## मालेगावच्या तिवळी गावातील घटना

पॉवर ग्रीड टॉवरला गळफास घेऊन आत्महत्या केली. इंद्रायणीसह दोन्ही चिमुकल्या मुलांचे हात बांधलेल्या अवस्थेत आढळल्याची माहिती समोर आली आहे. ही माहिती गावकऱ्यांना समजताच त्यांनी याबाबत पोलिसांना कळवले. त्यानंतर शिरपूर जैन पोलीस घटनास्थळी पोहोचले. एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने तिवळी गावासह जिल्हा हादरून गेला. मात्र, बहीण इंद्रायणीसह दोन चिमुकल्याचा आणि जावई संतोष बकाल यांचा मृत्यू झाल्याने ही आत्महत्या नसून घातपात झाल्याचा संशय मृत महिलेच्या भावाने केला आहे. संतोषचा भाऊ संपत्तीवरून नेहमी संतोष आणि त्यांच्या पत्नीसोबत वाद घालत मारहाण करत असल्याचा आरोप मृत महिलेचा भाऊ सुधाकर इंगोले यांनी केल्याने प्रकरणाची गुंतागुंत वाढली आहे.

# भंडारा-साकोली महामार्गावर अपघात! दोघांचा जागीच मृत्यू

■ भंडारा

**भंडारा-साकोली** राष्ट्रीय महामार्गावर धारगाव येथे आज सकाळी झालेल्या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. महामार्गावरून पायी जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून फरार झाला.

ही घटना धारगाव येथील पेट्रोलपंपासमोर घडली. या अपघातात कुंडलिक वालदे ( ६३) आणि भिवा बोंदले ( ७०) यांचा मृत्यू झाला. दोघेही धारगाव येथील रहिवासी होते. दोघे राष्ट्रीय महामार्गावरून पायी जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघेही गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मात्र, गंभीर दुखापतींमुळे दोघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर कारधा पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत.

# 'गेल' कंपनीच्या सब स्टेशनमुळे भाकरवड गावाला पुराचा धोका

## प्रशासनाकडे अहवाल सादर

■ अलिबाग

**तालुक्यातील** भाकरवड गावात गेल इंडिया कंपनीच्या सुरू असलेल्या सबस्टेशन प्रकल्पामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलल्याने ग्रामस्थांनी संभाव्य पुराची भीती व्यक्त केली आहे. ज्या ठिकाणी सबस्टेशन उभारले जात आहे, तिथून अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या वाहून जात होते. मात्र प्रकल्पाच्या बांधकामामुळे हा नैसर्गिक प्रवाह अडवला किंवा बदलला जात आहे. यामुळे मुसळधार पावसात पाणी थेट गावात घुसण्याची आणि संपर्क तुटण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांच्या तक्रारीवरून महसूल विभागाने प्रत्यक्ष जागेची पाहणी केली असून, प्रशासनाकडे अहवाल सादर केला आहे. भाकरवड ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष शंकर बाळू पाटील यांनी यासंदर्भात प्रशासनाकडे तक्रार अर्ज सादर केला होता. त्या अनुषंगाने महसूल विभागाने ५ जून रोजी प्रत्यक्षस्थळ पाहणी केली. पाहणीदरम्यान भाकरवड येथे गेल कंपनीचे सबस्टेशनचे बांधकाम सुरू असल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ज्या ठिकाणी सबस्टेशन उभारले जात आहे, त्या परिसरातून अनेक वर्षांपासून पावसाचे पाणी नैसर्गिकरित्या वाहून जात होते. मात्र, प्रकल्पाच्या कामामुळे हा प्रवाह बदलण्यात येत असून, त्यामुळे मुसळधार पावसाच्या काळात पाणी गावात घुसण्याची आणि पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे.

# उमरेड जंगलातील नाल्यात मृतावस्थेत आढळला पट्टेरी वाघ

■ नागपूर

**जिल्ह्यातील** दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रातील मौजा चनोडा शिवारात एक पट्टेरी नर वाघ मृतावस्थेत आढळला आहे. हा वाघ अंदाजे ५ ते ६ वर्षे वयाचा असावा, असे वनविभागाने म्हटले आहे. दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रातील नांद्रा (पश्चिम) नियतक्षेत्रातील मौजा चनोडा शिवारातील वनकक्ष क्रमांक ३६४ जवळ एका नाल्यामध्ये हा वाघ मृतावस्थेत आढळला.

प्राथमिक तपासणीत मृत वाघाचे सर्व अवयव कातडी, नखे, दात आणि मिशा हे सर्व अवयव शाबूत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी शिकारीचा कोणताही संशय व्यक्त करण्यात आलेला नाही. न्यायवैद्यकीय तपासणीसाठी नमुने गोळा करण्यात आले असून, मृतदेहाचे दहन करण्यात आले आहे.

# कराड तालुक्यातील कृष्णा नदीचे पाणी झाले गडद हिरवे

■ कराड



**तालुक्यातील** नांदगांव, तारगांव येथील कृष्णा नदीच्या पाण्याला हिरवा गडद रंग चढला आहे. नदी प्रवाहातून वाहणारे पाणी सुद्धा हिरवे गडद वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना या दूषित पाण्याने संसर्ग बाधा होण्याचा धोका असल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

सातारा, कोरेगाव, कराड तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरणारी कृष्णा नदी वेगळ्याच समस्याने ग्रासलेली आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून नदीतील पाणी हिरवे झाल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, हे प्रमाण नगण्य होते. मात्र सध्याच्या घडीला या पाण्याचा रंग गडद हिरवा दिसत आहे. या प्रकारामुळे पर्यावरण तसेच जलचर जीवसृष्टीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे.

आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अचानक पाण्याने रंग बदलल्याने तर्कवितर्क आणि संभ्रम निर्माण झाला आहे.

# विकासक भाडे भरत नसल्याने घरे रिकामी करण्याचे शिवशाहीला आव्हान

■ मुंबई

**झोपू** योजना राबविणाऱ्या खासगी विकासकांकडे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत घरांचे ९६ कोटी रुपये थकीत भाडे आहे. भाडे भरण्यासाठी शासनाने पाच विकासकांना सवलत व मुदत दिली आहे. तरीही विकासक वेळकाढूपणा करत आहेत. त्यामुळे भाडेतत्वावर दिलेली घरे रिकामी करून काढून घेण्याचे शिवशाही समोर आव्हान आहे, अशी कबुली एका अधिकाऱ्याने दिली.

अधिक माहिती देताना असे सांगण्यात आले की, एसआरए योजना राबिवणाऱ्या पाच विकासांच्या झोपडीधारकांना तात्पुरत्या स्वरूपात राहण्यासाठी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाने उपनगरातील आपली घरे काही वर्षांपूर्वी भाडेपट्टीवर दिली आहेत. मूळ भाडे, व्याज व वार्षिक वाढ अशी थकबाकीची एकूण रक्कम ११६ कोटी रुपयांवर गेली होती. विकासकांनी केलेल्या मागणीनुसार मार्च महिन्यात शिवशाहीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विकासकांना सवलत देताना ३० जून पर्यंत ९६ कोटी रुपये भरण्याची मुदत देण्यात आली आहे. तरीही विकासक आपल्याकडील थकीत भाड्यांची रक्कम भरण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे त्यांच्या ताब्यात असलेली घरे काढून घेण्याचे सूतोवाच करून शिवशाही कार्यालयातून असे सांगण्यात आले की, थकबाकीदार विकासकांवर जून नंतर कारवाई अटळ आहे.

# 'एआय'ने पकडली मुंबईतील नालेसफाई कामातील 'हेराफेरी'

## कंत्राटदारांना ठोठावला तब्बल ९ कोटींचा दंड

■ मुंबई

**शहरातील** नालेसफाईच्या कामातील कंत्राटदारांची हेराफेरी 'एआय' तंत्रज्ञानाने पकडली असून, संबंधित कंत्राटदारांना ९ कोटी २५ लाख ७२ हजार ८३० रुपयांचा दंड पालिकेने ठोठावला आहे. ही दंडात्मक रक्कम कंत्राटदाराच्या देयकांमधून वसूल करण्यात येत आहे. आयुक्त अश्विनी भिडे यांच्या निर्देशानुसार, पर्जन्य जलवाहिन्या विभागाने ही कारवाई केली.

पालिका प्रशासनाने नालेसफाईच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली लागू केली आहे. नालेसफाई केल्याची जी छायाचित्रे आणि चित्रफिती अपलोड केल्या जातात, त्या सगळ्यांची एआय प्रणाली पाहणी करते. तसेच त्यातील त्रुटी शोधून काढते. त्यानुसार नालेसफाईच्या कामांमध्ये आवश्यक संयंत्रे, यंत्रसामग्री व वाहनांची अपुरी उपलब्धता, मनुष्यबळाची कमतरता, नाले सफाईचे काम करणाऱ्या कामगारांना सुरक्षा साधनांचा पुरवठा न करणे, उपसलेल्या गाळावर प्रक्रिया न करणे तसेच कामे संथ गतीने करून निर्धारित वेळापत्रकाचे पालन न करणे, अशा विविध प्रकारच्या त्रुटी आढळल्या आहेत. नालेसफाई कामांमध्ये जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणाने झालेल्या त्रुटी अक्षम्य आहेत. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांना ९ कोटी २५ लाख ७२ हजार ८३० रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही दंड रक्कम कंत्राटदारांच्या देयकांमधून कापून घेतली जाईल, असे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.

# आंबोली घाटात मुख्य धबधबा परिसरात मोठे दगड कोसळले

■ सावंतवाडी

**आंबोली** घाटातील मुख्य धबधबा परिसरात आज सकाळी भलेमोठे दगड रस्त्यावर कोसळले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

घटनेनंतर स्थानिकांनी तत्काळ रस्त्यावर पडलेले दगड बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. गेळे गावचे सरपंच सागर ढोकरे यांनी याबाबत माहिती दिली. वर्षा पर्यटनाला सुरुवात झालेल्या पार्श्वभूमीवर या घटनेमुळे पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरडप्रवण भागाचा पंचनामा नुकताच करण्यात आला होता. मात्र, संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळेच ही घटना घडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. विकेंडला मोठ्या संख्येने पर्यटक आंबोलीत येत असल्याने प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# शाळा प्रवेशाचा आनंदोत्सव

जून महिना म्हणजे शैक्षणिक वर्षाची सुरुवात. आजपासून राज्यभरातील सगळ्या शाळा सुरू झाल्या आहेत. अनेक शाळांमधून शाळा प्रवेशाचे उत्सव घडून आणण्याची एक नवी परंपरा गेल्या काही वर्षांपासून पाहायला मिळते. शाळांमध्ये छानपैकी मंडप घातले जातात, तोरणं लावून शाळेचे प्रवेशद्वार सजवले जाते, चांगले सांस्कृतिक पोशाख करून शिक्षक, तिथला कर्मचारी वर्ग येणाऱ्या विद्यार्थ्यांचं गुलाबपुष्प किंवा खाऊ देऊन स्वागत करत असतो. सरस्वतीच्या मंदिरामध्ये घडून येणारा हा उत्सव निश्चितच विद्येच्या आराधनेसाठी उपयुक्त म्हणावा लागेल. शाळा प्रवेश किंवा शाळेचा पहिला दिवस हा अनेकांच्या आयुष्यातला संस्मरणीय दिवस असतो. जवळपास महिना-दीड महिन्याची उन्हाळ्याची सुट्टी संपवून विद्यार्थी पुन्हा नव्या वर्गांमध्ये काही वेळेला नव्या मित्रांसह, नव्या अभ्यासाला सुरुवात करतात. एक एक वर्ष उत्तीर्ण होत त्यांचा शैक्षणिक आयुष्याचा हा प्रवास सुरू असतो. जीवन हीच एक मोठी पाठशाळा मानले जाते. परंतु यशस्वी जीवनासाठी ज्या ज्ञानाची आणि अभ्यासाची आवश्यकता आहे, त्याचे संस्कार रूपाने घडून येणारे आवर्तन हे संपूर्ण आयुष्यासाठी महत्त्वपूर्ण पायाभरणी करणारे ठरत असते. शाळांमधून अभ्यास तर शिकवला जातोच. परंतु जीवनमूल्यांचे देखील तितकेच महत्त्वपूर्ण धडे सहज गिरवले जातात. सगळ्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने, सोबतीने घडून देणारी ही शिक्षण व्यवस्था म्हणजे समाजामध्ये कसं वागावं, कसं बोलावं, मित्र जोडण्याची कला, शिक्षकांविषयीचा आदर, कृतज्ञता आणि एकूणच शिक्षकांसाठीसुद्धा आपण घडवत असलेल्या विद्यार्थ्यांना देशाचा एक जबाबदार नागरिक म्हणून निर्माण करण्याची तितकीच महत्त्वपूर्ण भूमिका या सगळ्या गोष्टी एका शाळा नावाच्या इमारतीशी जोडलेल्या असतात. शाळा या केवळ दगड विटांच्या बनलेल्या इमारती नसतात. तर या ठिकाणी संस्कारांच्या छत्रछायेखाली शिक्षणाचा ध्यास घेण्याची प्रेरणा मिळते. कुटुंब व्यवस्था त्यामध्ये आई-वडिलांचे, भाऊ बहिणीचे जितके महत्त्वाचे स्थान असते तितकेच शाळेमध्ये शिक्षक, मुख्याध्यापक आपल्या बरोबरचे मित्र आणि त्या मित्रांच्या घरचा परिवार सुद्धा शाळेच्या निमित्ताने काही काळासाठी का होईना, परंतु एकमेकांच्या संपर्कात येत असतो. एक दहा-बारा वर्षांचा आगळावेगळा एक शैक्षणिक परिवार तयार होत असतो. ज्यातून निश्चितच वेगवेगळ्या टप्प्यांवर, वेगवेगळ्या प्रसंगांच्या वेळी वागण्या बोलण्याचे, जगण्याचे, धडे गिरवले जात असतात. म्हणूनच शाळा शिक्षणाबरोबर जीवनमूल्यांचे धडे देणारी पाठशाळा ठरते.

### जीवनमूल्यांचे धडे

या दृष्टिकोनातूनसुद्धा शाळांमधला प्रवेश हा किती महत्त्वपूर्ण आहे आणि एकूणच जीवनाच्या यशस्वी आनंदवर्धनासाठी त्याची अनिवार्यता कशी आहे हे सिद्ध करण्याचे काम या शाळा प्रवेशाच्या आनंदोत्सवातून पाहायला मिळते. एक काळ असा होता की, शाळेचा पहिला दिवस म्हटल्यानंतर प्रथमच शाळेत जाणारे विद्यार्थी सहजासहजी शाळेत जायला तयार होत नसत. अगदी छोटी छोटी लहान मुलं. पहिली दुसरीतली ही मुलं शाळेतला पहिला दिवस म्हणजे त्यांच्या नाराजीचा किंवा रडत कुरकुर करीत तक्रारी करत शाळेत येण्याचा पहिला दिवस मानला जात असे. आई-वडील जबरदस्तीने त्यांना शाळेत घेऊन येत असत आणि त्यांचा पहिला दिवस असाच काही नाराजीने सुरू व्हायचा. अर्थात सगळ्यांच्या बाबतीत असा प्रकार जरी होत नसला तरी बहुतांश विद्यार्थ्यांच्या बाबतीत शाळेचा पहिला दिवस हा नाराजीचा दिवस असायचा. कारण पुन्हा एकदा अभ्यासाचं ओझं आणि त्यासाठी रोज शाळेत जाणं हा भाग विद्यार्थ्यांना नकोसा असतो. बालसुलभ मनाला अशा प्रकारची जबरदस्ती नकोशी असते. म्हणूनच पहिल्या दिवसाच्यानिमित्ताने ही नाराजी व्यक्त होते. परंतु एकदा शाळा सुरू झाल्या आणि विद्यार्थी जायला लागला की, त्याला त्याची जाणीव होते की, आपल्याला आता हा वर्षभर अभ्यास करायचा आहे. मात्र अलीकडच्या काळामध्ये शाळा प्रवेशाला मिळालेले हे आनंद उत्सवाचे स्वरूप खूपच सकारात्मक वातावरण निर्माण करणारे ठरले आहे. विद्यार्थ्यांमध्ये शाळेची गोडी आपोआप निर्माण करणारे आणि त्यांच्यात अभ्यासाविषयी सुद्धा आवड निर्माण करण्यासाठी प्रेरणा देणारे ठरते आहे. आता फक्त प्रश्न एवढा उरतो की, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा म्हणून प्रयत्न होत असतात. पूर्वीच्या काळी शिक्षक अनेकांच्या घरी जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत आणण्याचा प्रयत्न करत असत. आता मात्र शाळा प्रवेशासाठी रांगा लावाव्या लागतात. डोनेशन देण्याची वेळ येते आणि त्यासाठी भरमसाठ पैसेही मोजावे लागतात.

### शिक्षणाचे व्यापारीकरण

गेल्या ४० वर्षांमध्ये बदललेले हे शिक्षणाचे स्वरूप शिक्षणाच्या सुलभीकरणाला जरी प्रोत्साहन देत असले तरी त्याच्या व्यापारीकरणाला सर्वाधिक महत्त्व प्राप्त झाल्याची जाणीव करून देते हे नाकारून चालणार नाही. सरकारने शिक्षण या क्षेत्राकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. अभ्यासाबरोबरच शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांविषयीची आत्मियता अधिक वाढण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, आज शाळांमध्ये कायमस्वरूपी नोकरी मिळवण्याकरता शिक्षकांकडूनही भरमसाठ पैसे घेतले जातात आणि त्यानंतर त्या शिक्षकांचा दृष्टिकोनदेखील तितकाच तात्पुरत्या स्वरूपाचा राहतो. विद्यार्थ्यांबाबतची आत्मियता राहत नाही, हीदेखील तितकीच वस्तुस्थिती आहे. म्हणूनच शाळा प्रवेशाच्या या आनंद उत्सवातून आत्मियतापूर्ण वातावरण वर्षभर त्या ठिकाणी कसं राहील याचा तितक्याच गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. लहानपणी शाळा या संकल्पनेवर अनेक प्रकारच्या कथा-कविता लिहिल्या गेल्या आणि शालेयजीवन हे मनुष्याच्या आयुष्याचा किती मूलभूत प्रवास आहे याची जाणीव अशा प्रकारच्या साहित्यातून, लिखाणामधून वारंवार करून दिली गेली. शाळेबरोबरचं हे नातं अधिक घट्ट करण्यासाठी शाळाप्रवेश आनंददायक करण्याचा प्रकार वैशिष्ट्यपूर्ण ठरतोच. मात्र त्यासोबत शिक्षक आणि संस्थाचालकांच्या व्यवहारांमध्ये देखील तितकीच संवेदनशीलता आणि आत्मियता निर्माण होणे काळाची गरज ठरते आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

शक्तीचा वापर नेहमी न्यायासाठीच करावा. कारण अन्यायासाठी वापरलेली शक्ती ही विनाशाचे कारण ठरते.

## पंचांग



**सोमवार, १५ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ अमावास्या/ शुक्ल प्रतिपदा**
**नक्षत्र : मृग**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१६**

**अमावास्या समाप्ती सकाळी ८.२४, अधिक मास समाप्ती, पुरुषोत्तम मास समाप्ती, सूर्य मिथुन रात्री १२.५२, पुण्यकाळ दुपारी १२.५२ ते सूर्यास्त**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### चिझ-गार्लिक पराठा



★ **साहित्य :-** गव्हाचे पीठ- २ वाट्या, २ चमचे बटर, २ चमचा बारीक चिरलेला लसूण, १ चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर, १/२ चमचा चिली फ्लेक्स आणि १ कप बारीक केलेले चिझ, चवीनुसार मीठ, पीठ मळण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणी, १/२ चमचा, तूप ४ चमचे, काळी मिरी पावडर १/४ टी स्पून.

★ **कृती :-** सर्वप्रथम एका परातीत गव्हाचे पीठ, चवीनुसार मीठ, १ चमचा तेल टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर लागेल तसे पाणी टाकून मऊ पीठ मळून घ्या. ते १५ मिनिटे झाकून ठेवा. आता एका वाटीत बटर, बारीक चिरलेला लसूण, कोथिंबीर, ऑरिगेनो आणि काली मिरी पावडर टाकून मिक्स करून घ्या. त्यात चवीनुसार मीठ टाकून मसाला तयार करा. गव्हाच्या पिठाची नेहमीसारखी पोळी लाटून घ्या. त्यावर हे मिश्रण सर्व बाजूंनी पसरवून लावा. वरून भरपूर चिझ किसून टाका आणि थोडे चिली फ्लेक्स स्प्रिंकल करा. आता पोळीला चौकोनी किंवा त्रिकोणी आकारात दुमडून करून हलक्या हाताने परत लाटून घ्या. लक्षात ठेवा की, पराठा जास्त पातळ किंवा जाड लाटू नये. तव्यावर साजूक तूप किंवा बटर लावून दोन्ही बाजूंनी खरपूस आणि कुरकुरीत भाजून घ्या. गरमागरम चिझ गार्लिक पराठा सॉससोबत सर्व्ह करा!




# ऑस्ट्रेलियाचा तुर्कियेवर २-० ने दणदणीत विजय

## गोलरक्षक पॅट्रिक बीचने ८ उत्कृष्ट बचाव केले

**फिफा विश्वचषकाच्या तिसऱ्या दिवशी 'ड' गटातील सामन्यात नेस्टोरी इर्कुंडा आणि कॉनर मेटकाफ यांच्या गोलमुळे ऑस्ट्रेलियाने तुर्कियेला २-० ने पराभूत करून विजयी सलामी दिली. २४ वर्षांनंतर विश्वचषकात पुनरागमन करणाऱ्या तुर्कियेची कामगिरी निराशाजनक ठरली. ऑस्ट्रेलियाच्या विजयाचे श्रेय गोलरक्षक पॅट्रिक बीचलाही जाते, त्याने गट 'ड'च्या या सामन्यात आठ उत्कृष्ट बचाव केले.**



■ व्हँकुव्हर

**पहिल्या** हाफमध्ये सुरुवातीपासूनच तुर्कियेने बॉलवर ताबा मिळवला होता. ज्यामुळे ते सामना जिंकू शकतील असे वाटत होते. परंतु ऑस्ट्रेलियाचा बचाव प्रभावी ठरला. सुरुवातीच्या दबावाला सामोरे गेल्यानंतर ऑस्ट्रेलियाने हळूहळू खेळावर नियंत्रण मिळवले आणि २७ व्या मिनिटाला पहिला गोल केला. एका वेगवान पासनंतर नेस्टोरी इर्कुंडाने आपल्या सहकाऱ्याकडून पास घेऊन गोलरक्षक उगुरकान चाकिरला चकवून गोल केला आणि ऑस्ट्रेलियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली.

दुसऱ्या हाफमध्ये तुर्कियेने आक्रमकपणा वाढवला. बरोबरी साधण्याच्या प्रयत्नात तुर्कियेच्या प्रशिक्षक व्हिन्सेंझो मॉन्टेला यांनी अनेक आक्रमक खेळाडूंना मैदानात उतरवले. अधिक वेळ चेंडूचा ताबा असूनही ऑस्ट्रेलियाच्या मजबूत बचावामुळे तुर्किये संघ हताश झाला. हाकान चालहानोग्लू आणि केरेम अकटुर्कोग्लू यांचे फटके गोलरक्षकाची मध्यरेषा भेदण्याइतके जोरदार नव्हते. ७५ व्या मिनिटाला कॉनर मेटकाफने पेनल्टी एरियासमोरील मोकळ्या जागेचा फायदा घेऊन एक जोरदार शॉट मारला, ज्यामुळे आघाडी दुप्पट झाली आणि सामना जवळजवळ जिंकला. विश्वचषकाच्या 'ड' गटाच्या गुणतालिकेत ऑस्ट्रेलियाने ३ गुणांचे अव्वल स्थान गाठले आहे तर तुर्कीयेचे खाते रिकामे राहिले.

**मंगळवार १६ जूनचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| १२.३० मध्यरात्री | बेल्जियम विरुद्ध इजिप्त |
| ३.३० पहाटे | सौदी अरेबिया विरुद्ध उरुग्वे |
| ६.३० पहाटे | इराण विरुद्ध न्यूझीलंड |

## विश्वचषकात स्कॉटलंडचा ३६ वर्षांनी विजय

■ फॉक्सबरो



**फिफा** विश्वचषकाच्या 'क' गटातील सामन्यात स्कॉटलंडने हैतीला १-० ने पराभूत करून एक उत्कृष्ट कामगिरी केली. हा स्कॉटलंडचा ३६ वर्षांतील पहिला विश्वचषक विजय होता. सातव्या मिनिटाला स्कॉट मॅकटोमिनेने शानदार हेडर मारून गोल केला.

पहिल्या हाफमध्ये हैतीने प्रतिहल्ला करून स्कॉटलंडवर दबाव कायम ठेवला. मात्र २९ व्या मिनिटाला स्कॉटलंडने आघाडी घेतली. फॉरवर्डचे डम्सने एक लांब चेंडू नियंत्रित करून तो बेन गॅनन-डोककडे पास केला. त्याचा क्रॉस एका हैतीयन बचावपटूने अडवला. मात्र बॉल जॉन मॅकगिनपर्यंत पोहोचला. मॅकगिनने बॉक्सच्या कडेवरून एक जोरदार शॉट मारला, जो गोलकीपर जॉनी प्लॅसिडला किंचित लागून जाळ्यात गेला. गोल झाल्यानंतर हैतीने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. हायड्रेशन ब्रेकनंतर संघाने काही चांगल्या चाली केल्या. रुबेन प्रोव्हिडन्सने विंगवरून आत शिरकाव करून एक खालच्या दिशेने शॉट मारला, जो स्कॉटलंडचा गोलकीपर अँगुस गनने अडवला. दुसऱ्या हाफमध्येही दोन्ही संघांनी आपला आक्रमक खेळ सुरू ठेवला, पण कोणालाही गोल करता आला नाही. त्यामुळे स्कॉटलंडने सामना १-०ने जिंकला.

## कतार आणि स्वित्झर्लंडचा सामना १-१ ने बरोबरीत सुटला

**कॅलिफोर्निया** - कॅलिफोर्नियाच्या सांता क्लारा येथे झालेल्या विश्वचषकाच्या 'ब' गटात कतारने सामन्यातील अतिरिक्त वेळेत उल्लेखनीय पुनरागमन करून स्वित्झर्लंडविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधली. अतिरिक्त वेळेच्या चौथ्या मिनिटाला कतारचा कर्णधार बौलेम खौखीने हेडरद्वारे केलेल्या गोलने स्वित्झर्लंडच्या विजयाच्या आशा संपुष्टात आणल्या. स्वित्झर्लंडने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत कतारच्या बचावफळीवर सतत दबाव टाकला. स्वित्झर्लंडच्या खेळाडूंना सुरुवातीच्या काही मिनिटांतच गोल करण्याच्या संधी मिळाल्या. मात्र त्यांना त्या साधता आल्या नाहीत. १७ व्या मिनिटाला कतारचा गोलरक्षक महमूद अबुनादाने बॉक्समध्ये रेमो फ्रोहेलरवर फाऊल केल्या. व्हिडिओ असिस्टंट रेफरीद्वारे पुनरावलोकन केल्यानंतर पेनल्टी देण्यात आली.



## ब्राझील आणि मोरोक्कोचा सामना १-१ ने अनिर्णित

■ न्यू जर्सी

**न्यू जर्सी** येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या 'क' गटातील ब्राझील आणि मोरोक्को संघाचा बहुप्रतिक्षित सामना १-१ असा बरोबरीत सुटला. जगातील अव्वल संघांमध्ये गणल्या जाणाऱ्या या दोन देशांमधील हा अत्यंत चुरशीचा सामना सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत रोमांचक होता. निर्धारित ९० मिनिटांनंतर पंचांनी १० मिनिटांचा अतिरिक्त वेळ दिला. परंतु दोन्ही संघांना विजयी गोल करता आला नाही. परिणामी दोन्ही संघांना प्रत्येकी एका गुणावर समाधान मानावे लागले.

सामन्याच्या सुरुवातीला दोन्ही संघांनी आक्रमक पवित्रा घेतला. परंतु मोरोक्कोने पहिला गोल केला. २१ व्या मिनिटाला ब्राहिम दियाझने एका अप्रतिम थ्रू बॉलने ब्राझीलचा बचाव भेदला. इस्माईल श्याबारीने गोलरक्षक लिसनला चकवून एक उत्कृष्ट धाव घेतली आणि एका अप्रतिम चिप शॉटने बॉल जाळ्यात टाकला. श्याबारीच्या या सुंदर गोलमुळे मोरोक्कोला १-० अशी आघाडी मिळाली. ब्राझीलने लवकरच जोरदार पुनरागमन केले. ३२ व्या मिनिटाला ब्रुनो गिमारेसच्या पासवर विनिसियस ज्युनियरने अप्रतिम वैयक्तिक कौशल्य दाखवले. डाव्या बाजूला बॉल मिळाल्यावर त्याने उजव्या पायाने जोरदार शॉट मारला, जो थेट जाळीत धाडला.

## महिला विश्वचषकात भारताची विजयी सलामी

» पान १ वरून

शफाली वर्मा ६ धावांवर बाद झाली. त्यानंतर तस्मिया रुबाबने जेमिमाला केवळ १ धावेवर झेलबाद केले. मग कर्णधार हरमनप्रीत कौरच्या स्मृती मंधानाने संघाचा डाव सावरला. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ६३ चेंडूंमध्ये ९१ धावांची भागीदारी केली. मग मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात मंधाना झेलबाद झाली. त्याने ४४ चेंडूंत ६८ धावा केल्या. १६.२ षटकात हरमनप्रीतने षटकार ठोकण्याच्या नादात झेलबाद झाली. त्याने ३५ चेंडूंत ३६ धावा केल्या. यष्टीरक्षक रिचा घोषने शेवटच्या षटकात वेगाने धावा केल्या. दिप्ती शर्माच्या साथीत ती २०० च्या स्ट्राईक रेटने १७ चेंडूंत ३४ धावांवर बाद झाली आणि शेवटी दिप्ती शर्मा ९ चेंडूंत १२ आणि श्रेयंका पाटील नाबाद १ धाव करून नाबाद राहिल्या. त्यामुळे भारताला १७० धावांपर्यंत पोहोचता आले. पाकिस्तानकडून सादिया इक्बाल आणि सना फातिमा यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

१७० धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात चांगली झाली होती. मुनीबा अली आणि गुल फिरोजा यांनी पहिल्या विकेटसाठी ४.४ षटकांत ३८ धावांची भागिदारी केली. ही जोडी दिप्ती शर्माने फोडून गुल फिरोजाला १२ धावांवर झेलबाद केले. पाकिस्तानची धावसंख्या १०.५ षटकांत ३ बाद ७५ असताना दिप्ती शर्माने मुनीबा अलीला ४१ धावांवर धावचित केले. त्यानंतर दीप्ती शर्मा आणि श्री चरणी यांनी आपल्या फिरकीची जादू दाखवत पाकिस्तानच्या एका मागून एक विकेट घेतल्या आणि भारताने पाकिस्तानचा डाव सर्वबाद १०६ धावांवर गुंडाळला. भारताकडून दीप्ती शर्माने ५ गडी आणि श्री चरणीने दोन गडी बाद केले.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, पालघर**
**ई-निविदा सुचना क्रमांक - ०६ सन २०२६ - २०२७**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पालघर बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी, पालघर-बोईसर रोड, ता. जि. पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांच्याकडून खालील कामांकरीता **'ब-१'** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. सदर निविदा सूचनेमध्ये **एकूण ०५ (पाच) काम** समाविष्ट आहे.

**टिप** - या निविदेवरील संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

**1) https://pwd.maharashtra.gov.in/ 2) https://mahatenders.gov.in**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. लक्ष (रुपये) (जी.एस.टी. वगळून) | अंदाजित रक्कम रु. लक्ष (अक्षरी) (जी.एस.टी. वगळून) | लेखाशिर्ष | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे सोनावे वांद्री रस्त्यावरील कालव्यावर ग्रा.मा. क्र. १६१ वर सा.क्र. ० / २०० मध्ये लहान पूलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.३२८०३५५/- | अक्षरी रु. बत्तीस लक्ष ऐन्शी हजार तीनशे पचावन्न | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ ५०५४ ०७५२ (नाबार्ड-३१) | वर्ग ५ व त्यावरील |
| २ | मौजे तांदुळवाडी रस्ता ग्रा.मा. २४७ वर सा.क्र. ० / २०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.३२१६०८६/- | अक्षरी रु. बत्तीस लक्ष सोळा हजार श्याअंशी मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ ५०५४ ०७५२ (नाबार्ड-३१) | वर्ग ५ व त्यावरील |
| ३ | मौजे गिराळे रस्ता ग्रा.मा. १५६ वर सा. क्र. ०/२०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.५७८६५७६/- | अक्षरी रु. सत्तावन लक्ष श्याअंशी हजार पाचशे शहात्तर मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ ५०५४ ०७५२ (नाबार्ड-३१) | वर्ग ४-अ व त्यावरील |
| ४ | मौजे दहिसर तर्फे मनोर ऑफिसपाडा रस्ता ग्रा.मा.क्र. २३१ वर सा.क्र. ०/५५० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. जि. पालघर | रु.४८०५८०४/- | अक्षरी रु. अठ्ठेचाळीस लक्ष पाच हजार आठशे चार मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ ५०५४ ०७५२ (नाबार्ड-३१) | वर्ग ५ व त्यावरील |
| ५ | पालघर तालुक्यातील मौजे बऱ्हाणपूर मुख्य रस्ता ते वाणीपाडा जोड रस्ता ग्रा.मा. ४७ वर सा.क्र. ०/४०० मध्ये जोडरस्त्यासह लहान पुलाचे बांधकाम करणे. ता.जि.पालघर | रु.७९५४६४३/- | अक्षरी रु. एकोणऐंशी लक्ष चोपन्न हजार सहाशे त्रेचाळीस मात्र | ५०५४ मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०५ ५०५४ ०७५२ (नाबार्ड-३१) | वर्ग ४-अ व त्यावरील |

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

वरिल कामाची ई-निविदा उपलब्ध कालावधी - दि. १५/०६/२०२६ ते दि. २२/०६/२०२६ पर्यंत.
ई-निविदा उघडणे - दि. २५/०६/२०२६ शक्य झाल्यास सकाळी ११.०० नंतर.


जा.क्र. सा.बां.वि/पालघर/निविदा/४०८५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पालघर
बांधकाम भवन इमारत, ढवळे रुग्णालया शेजारी,
पालघर-बोईसर रोड, ता. जि. पालघर (पश्चिम)-४०१ ४०४
दिनांक : ०८/०६/२०२६

**सही/-**
**(म.पां. किणी)**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर**

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी १११७

# सुख शांती समाधान

# सूर्यदोष दूर करण्यासाठी भानूसप्तमीला हे करा...



**प्रत्येक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या सप्तमी तिथीला भानुसप्तमी साजरी केली जाते. भानु सप्तमीच्या दिवशी सूर्यदेवाची उपासना करून काही गोष्टींचे दान करावे, अशी धार्मिक श्रद्धा आहे. भगवान सूर्याचे दुसरे नाव भानू आहे. भानु सप्तमीचा दिवस सूर्यदेवाच्या उपासनेसाठी अत्यंत शुभ मानला जातो. भक्तिभावाने आणि खऱ्या भक्तीने सूर्याची उपासना करणाऱ्या भक्तांना आरोग्य आणि समृद्धी लाभते, असे म्हटले जाते. पंचांगानुसार, या महिन्यात निज ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाची सप्तमी तिथी रविवार २१ जून रोजी येत आहे. रविवार हा सूर्यदेवाच्या उपासनेचा वार आहे. त्यामुळे हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. या दिवशी सूर्याची पूजा करण्याची परंपरा आहे. या दिवशी ग्रहांचा राजा सूर्यदेवाची पूजा, जप-तप आणि दान केल्याने पुण्य मिळते आणि जीवनात यश-प्रगतीसोबतच सकारात्मकता वाढते, अशी धार्मिक श्रद्धा आहे.**

भानु सप्तमीच्या दिवशी गूळ, तांदूळ, गहू, तांबे, माणिक रत्न, लाल फुले इत्यादी वस्तूंचे दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. या दिवशी वस्तूंचे दान केल्यास आर्थिक संकटातून मुक्ती मिळते असे मानले जाते. तसेच व्यक्तीला आदरही मिळतो. याशिवाय या दिवशी गंगा स्नान करणेही खूप शुभ मानले जाते.

भानु सप्तमीला सूर्यदोष दूर करण्यासाठी आणि सूर्याला बळ देण्यासाठी ब्रह्म मुहूर्तावर स्नान करावे. त्यानंतर, सूर्य उगवल्यावर तांब्याच्या भांड्यात पाणी भरा, त्यात लाल चंदन, लाल जास्वंदाचे फूल आणि गूळ घाला.

सूर्य मंत्र ओम घृणी: सूर्याय नम: चा जप करा आणि सूर्यदेवाला जल अर्पण करा. या उपायाने सूर्य दोष नाहीसा होईल.

तसेच तुम्ही आणखी एका मंत्राचा जप करू शकता.

मंत्र- एहि सूर्य सहस्त्रांशो तेजोराशे जगत्पते।
अनुकम्पय मां देवी गृहाणार्घ्यं दिवाकर।।

ॐ भूर्भुवः स्वःतत्सवितुवरेण्यं
भर्गो देवस्यः धीमहि धियो यो नः प्रचोदयात्।।

सूर्याला बळकटी देण्यासाठी, भानु सप्तमीला, लाल चंदनाच्या माळेने सूर्याच्या बीज मंत्राचा जप करा. सूर्यदोष दूर करण्यासाठी भानु सप्तमीला गहू, ग ू ळ , लाल कपडे, लाल चंदन, तांबे, तूप, लाल गाय, लाल फळे, सोने इत्यादी दान करा.

**भानु सप्तमी व्रत पद्धत**

सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करून सूर्यदेवाला लाल फुले, चंदन, अखंड मिश्रित जल अर्पण करावे. यानंतर आदित्य हृदय स्तोत्र किंवा सूर्य चालीसा पठण करावे. त्यानंतर सूर्यदेवाच्या मंत्राचा जप करावा. तसेच, सूर्यदेवाची आराधना करून सुखी व आनंदी जीवनाचा आशीर्वाद मागावा. फळे खावी. मीठ सेवन करू नका. काही लोक सूर्योदयानंतरच पारण करतात तर काही लोक दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर पारण करतात.

सूर्याची पूजा करताना या मंत्राचा जप करावा

*ॐ मित्राय नम:, ॐ रवये नम:, ॐ सूर्याय नम:. ॐ भानवे नम:, ॐ खगाय नम:, ॐ पूष्णे नम:, ॐ हिरन्यायगर्भाय नम:, ॐ मरीचे नम:, ॐ सवित्रे नम:,ॐ आर्काया नम:,*

*ॐआदिनाथाय नम:, ॐ भास्कराय नम:*
*ॐ श्री सवितसूर्यनारायणा नम:*

सूर्याला बळकटी देण्यासाठी, भानु सप्तमीला, लाल चंदनाच्या माळेने सूर्याच्या बीज मंत्राचा जप करा. सूर्यदोष दूर करण्यासाठी भानु सप्तमीला गहू, गूळ, लाल कपडे, लाल चंदन, तांबे, तूप, लाल गाय, लाल फळे, सोने इत्यादी दान करा.

भानु सप्तमीच्या दिवशी सूर्यदेवाची पूजा करण्याचा नियम आहे. सूर्यदेवाच्या कृपेने माणूस निरोगी आणि आनंदी राहतो. या दिवशी लोक भानु सप्तमीचे व्रत देखील ठेवतात. यामध्ये मीठ वापरण्यास मनाई आहे.

सूर्याच्या अशुभ प्रभावापासून बचाव करण्यासाठी, तांब्याच्या अंगठीत माणिक किंवा सूर्ययंत्र घाला. सूर्याच्या शुभ प्रभावासाठी, ११ रविवारी सूर्यस्नान करा. खाण्यासाठी तांब्याचा चमचा वापरा. रविवारी मीठ न खाणे चांगले होईल. रविवारी दही आणि भात खा.

तुमच्या कुंडलीत सूर्य कमकुवत असेल तर दररोज तुळशीच्या झाडाजवळ दिवा लावावा. याने तुम्हाला फायदा होईल.

या दिवशी काही वस्तूंचे दान केल्यास पित्यासोबतचे बिघडलेले नाते सुधारते आणि अपार कीर्ती प्राप्त होते. आठवड्यातील सात दिवसांपैकी रविवार हा सूर्यदेवाला समर्पित आहे. सनातन धर्मात सूर्यदेवाच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे. असे म्हटले जाते की, जर एखाद्या व्यक्तीला कुष्ठरोग आणि त्वचारोगापासून मुक्ती मिळवायची असेल तर त्याने सूर्यदेवाची पूजा करावी. पौराणिक मान्यतेनुसार, भगवान श्रीकृष्णाच्या पुत्रानेही पूर्वी सूर्यदेवाची पूजा केली होती. त्यामुळे त्याची कुष्ठरोगातून सुटका झाली. जर एखाद्या व्यक्तीच्या कुंडलीत सूर्य कमजोर असेल, तर ज्योतिषाकडून सूर्याला बल देण्यासाठी सूर्यनारायणाची पूजा करण्याचा सल्ला देण्यात येतो.

**टीप-** या लेखात सांगितलेले उपाय, सल्ले हे केवळ धार्मिक श्रद्धांवर आधारित असून दै. 'नवाकाळ' त्याचे समर्थन करत नाही.

# दुर्गाष्टमीचे उपाय...



**हिंदू धर्मामध्ये दुर्गाष्टमीला विशेष महत्त्व दिले जाते. धार्मिक ग्रथांनुसार, दुर्गाष्टमीचा दिवस दुर्गा देवीला समर्पित आहे. दुर्गाष्टमीच्या दिवशी दुर्गा देवीची पूजा केली जाते. या दिवशी दुर्गा देवीची पूजा केल्यामुळे तुमच्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात. मासिक दुर्गाष्टमीच्या दिवशी दुर्गा देवीच्यापूजेमध्ये काही विशेष गोष्टींचा समावेश केल्यामुळे तुम्हाला अधिक फायदा होतो. तुमच्या आयुष्यामधील महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत असतील आणि प्रगती होत नसेल तर तुम्ही मासिक दुर्गाष्टमीच्या दिवशी या गोष्टी केल्यामुळे सर्व समस्या दूर होण्यास मदत होते. दुर्गाष्टमीच्या दिवशी तुमच्या मनामधील विचार सकारात्मक ठेवा.**

या महिन्यात निज ज्येष्ठ महिन्याच्या शुक्ल पक्षाची अष्टमी तिथी सोमवार २२ जून रोजी येत आहे. मासिक दुर्गाष्टमीच्या दिवशी, सर्वप्रथम सकाळी लवकर उठून स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला.

पूजास्थळ स्वच्छ करा आणि माँ दुर्गेची मूर्ती किंवा चित्र स्थापित करा.

पूजा साहित्यात लाल फुले, चंदन, धूप, दिवा, नैवेद्य, नारळ, फळे, पंचामृत इत्यादींचा समावेश करा.

दुर्गा चालीसा, दुर्गा सप्तशती, सिद्ध कुंजिका स्तोत्र इत्यादींचे पठण करा.

पूजा करताना,
ओम ऐम ह्रीम क्लीम चामुंडाये विच्छे या मंत्राचा १०८ वेळा जप करा.

धूप, दिवे लावा आणि दुर्गा मातेची आरती करा आणि प्रसाद वाटा.

दुसऱ्या दिवशी, ब्राह्मणांना किंवा गरजूंना जेवण देऊन उपवास संपवा.

दुर्गा मातेच्या पूजेमध्ये या गोष्टींचा समावेश करा.

आई दुर्गेला लाल फुले खूप आवडतात. तुम्ही दुर्गा देवीला गुलाब, जास्वंद किंवा कोणतेही लाल फूल अर्पण करावे.

मासिक दुर्गाष्टमी हा दिवस केवळ धार्मिक विधींचा नसून स्वत:कडे बघण्याचाही आहे. उपवास आणि ध्यान केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. यामुळे मनातली भीती आणि असुरक्षितता कमी होऊन एक प्रकारचे भावनिक बळ मिळते.

आई अंबेला लाल चुनरी अर्पण करणे खूप शुभ मानले जाते. तसेच बांगड्या, बिंदी, सिंदूर इत्यादी मेकअपच्या वस्तू अर्पण करा.

देवी अंबेला फळे आणि मिठाई अर्पण करावी.

पंचामृत हे अतिशय पवित्र मानले जाते. तुम्ही दूध, दही, तूप, मध आणि गंगाजल मिसळून पंचामृत बनवू शकता आणि ते देवी अंबेला अर्पण करू शकता.

दुर्गा देवीच्या पूजेदरम्यान दिवा आणि धूप लावणे खूप शुभ आहे.

अष्टमीच्या दिवशी स्वच्छ राहणे, घरातील देव्हारा नीट ठेवणे आणि मनोभावे दिवा लावणे महत्त्वाचे आहे. उपायांपेक्षा तुमची श्रद्धा जास्त फलदायी ठरते. शक्य असल्यास कन्या पूजन केल्याने देवीचा आशीर्वाद मिळतो असे मानले जाते.

दुर्गा देवीच्या पूजेदरम्यान दुर्गा चालीसा किंवा दुर्गा सप्तशतीचे पठण करावे.

आजच्या काळात धावपळीमुळे रिलेशनमध्ये ताण-तणाव निर्माण होतो. अशा वेळी देवीला लाल चुनरी अर्पण करून सर्व मंगल मांगल्ये या मंत्राचा जप केल्याने मनाला शांती मिळते आणि घरातील वातावरण सुधारते. अनेक वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा सकारात्मक ऊर्जा निर्माण करते. पैशांची गुंतवणूक किंवा वाढते खर्च यामुळे येणारा मानसिक दबाव कमी करण्यासाठी देवीच्या पूजेत पाच पांढऱ्या कवड्यांचा वापर करणे शुभ मानले जाते. पूजेनंतर या कवड्या तिजोरीत ठेवल्याने धनलाभ होतो आणि कर्जातून सुटका मिळते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

## भारत नगरात म्हाडा स्वखर्चाने पाण्याचे मीटर लावणार! लाखोंचा भुर्दंड

■ मुंबई

**वांद्रे** (पूर्व) येथील भारत नगरातील रहिवाशांच्या सोयीसाठी म्हाडा प्राधिकरण स्वःखर्चाने स्वतंत्र असे पिण्याच्या पाण्याचे मीटर लावणार आहे. हा लाखो रुपयांचा आर्थिक भुर्दंड म्हाडाला सहन करावा लागणार आहे.

एका अधिकाऱ्यांने दिलेल्या माहितीनुसार भारत नगरमध्ये शेकडो चाळींची वसाहत म्हाडाच्या जमिनीवर वसलेली आहे. या वसाहतीत जवळपास एक हजार नळ जोडण्या आहेत. मात्र पिण्याच्या पाण्याचा मीटर म्हाडाच्या नावे असल्याने येथील रहिवाशांच्या पाणी बिलांची लाखो रुपयांची रक्कम म्हाडा पालिकेला अदा करत आली आहे. परंतु स्थानिक रहिवासी पाणी बिलांची रक्कम म्हाडाला देण्यास टाळाटाळ करत आले आहेत. वर्षानुवर्षांची कोट्यवधी रुपयांची थकबाकी म्हाडाच्या तिजोरीत जमा होत नसल्याचे चित्र आहे. म्हणून येथील चाळ कमिटीच्या नावे पाण्याचे मीटर लावण्यात यावेत आणि पाण्याची बिले रहिवाशांकडून वसूल केली जावीत, असा पर्याय म्हाडा पालिकेसमोर ठेवणार आहे.

## अकरावी ऑनलाईन प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी जाहीर

■ मुंबई

**७१ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश!**

**अकरावीच्या** केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची दुसरी गुणवत्ता यादी काल शनिवारी जाहीर करण्यात आली. या यादीत ७१ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे वाटप करण्यात आले आहे.

यामध्ये २९ हजार ५६९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. या विद्यार्थ्यांना १६ जूनला संध्याकाळी ६ वाजेपर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे.

दुसऱ्या फेरीत जागा मिळालेल्या ७१ हजार ८९ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३९ हजार १८७ विद्यर्थ्यांना वाणिज्य शाखेत, २४ हजार ४१८ विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेत आणि केवळ ७ हजार ४८४ विद्यार्थ्यांना कला शाखेत प्रवेश मिळाला आहे. यावरून वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठीची स्पर्धा यंदाही सर्वाधिक तीव्र असल्याचे दिसून येते. दुसऱ्या फेरीसाठी १ लाख ४६ हजार ८२७ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यापैकी ७१ हजार ८९ विद्यार्थ्यांना जागा वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, या विद्यार्थ्यांपैकी २९ हजार ५६९ जणांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. १२ हजार ७४ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीक्रमाची, तर ८ हजार ६०३ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीक्रमाची जागा मिळाली आहे.

## दोन सख्ख्या बहिणींसह चुलत बहिणीचा गोदावरीत बुडून मृत्यू

■ परभणी

**परभणी** जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील मोहळा येथे गोदावरी नदीत आज सकाळी अंघोळीसाठी गेलेल्या दोन सख्ख्या बहिणींसह त्यांना वाचवण्यासाठी पाण्यात उतरलेल्या त्यांच्या चुलत बहिणीचा बुडून मृत्यू झाला. या घटनेमुळे मोहळा गावासह जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

मोहळा येथील उत्कर्षा जाधव (१८) आणि समीक्षा जाधव (१६) या दोन्ही सख्ख्या बहिणी सकाळी गावाजवळील गोदावरी नदीवर अंघोळीसाठी गेल्या होत्या. अंघोळ करत असताना दोघींचा तोल गेल्याने त्या खोल पाण्यात बुडू लागल्या. दोन्ही मुलींना वाचविण्याच्या प्रयत्नात त्यांची चुलत बहीण सिंधू दत्ता जाधव (४५) हिने नदीत उडी घेतली. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने तीदेखील पाण्यात बुडाली. यानंतर ग्रामस्थांनी तातडीने शोधमोहीम सुरू करत तिघींनाही नदीतून बाहेर काढले. मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला.

## जळगावच्या उबाठा नगराध्यक्ष छाया पाटील-गिरीश महाजन भेट

■ जळगाव

**जळगाव** विधान परिषद निवडणुकीत जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुतीचे उमेदवार नंदकिशोर महाजन यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून उबाठाच्या शरद तायडे यांना उमेदवारी देण्यात आली असताना, यावल नगर परिषदेच्या उबाठाच्या नगराध्यक्षा छाया पाटील आणि त्यांचे पती तथा पक्षाचे पदाधिकारी अतुल पाटील यांनी जळगाव येथील भाजपा कार्यालयाला भेट दिली.

यावेळी त्यांनी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचीही भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असले, तरी या भेटीमागे कोणतेही राजकीय कारण नसल्याचे छाया पाटील यांनी स्पष्ट केले आहे. भाजपाकडून कोणत्याही प्रकारचे मतदानाचे आवाहन करण्यात आलेले नाही. आम्ही वैयक्तिक कामानिमित्त भेट घेतली. रुग्णालयाशी संबंधित काही कामासाठी आम्ही आलो होतो. विधान परिषद निवडणुकीत आम्ही महाविकास आघाडीच्या उमेदवारालाच पाठिंबा देणार आहोत, असे त्यांनी सांगितले. अतुल पाटील यांनीही याच भूमिकेचा पुनरुच्चार केला. आम्ही शंभर टक्के महाविकास आघाडीच्या उमेदवारासोबत आहोत. मी वैयक्तिक कामासाठी शहरात आलो होतो. आमचे मित्र आणि भाजपाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बाविस्कर यांना सहज फोन केला.


**TENDER NOTICE**

Sealed Item Rate Tenders are invited from Reputed & Experienced **DEMOLITION CONTRACTORS for Demolition works of existing Industrial Structure (W-90) Owned by M/s. AVA CHEMICAL PVT. LTD. on the basis of Rebate of existing goods (if any) as on condition of**

**AVA CHEMICALS PVT. LTD.**

**Plot No. W-90, MIDC, Badlapur (East), Dist. Thane, Maharashtra - 421 503**

Tender Document will be available at PMC's Office :
**M/s. RUSHABH SURENDRA KARNAVAT**
A/904, Gayatri CHSL, Behind Pantaloons, Umeda Ashram Road, Opp. Rajda School, Borivali (W), Mumbai 400092.
Cost of Tender :
**Rs. 5,000/- Cash Only (non-refundable)**
Tender Forms will be available from **15/06/2026** to **23/06/2026** between **11:00 am** to **01:00 pm** Only at PMC's Office.

Company & PMC reserves all the rights to cancelled the tender or to cancelled any scope of work in the tender or to reject all the tenders or the lowest tender or any other tender without assigning any reason to anyone at any point of time.

**Last Date of Tender Submission: 23/06/2026 TILL 03:30 PM**



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | मुख्य अभियंता (मलनिःसारण संचालन) |
| शाखा | उप मुख्य अभियंता (एस.ओ.), शहर<br>कार्यकारी अभियंता, यांत्रिकी (एस), वांद्रे विभाग |
| निविदा क्र. | २०२६_एमसीजीएम_१२९८४२२_१ |
| | **वांद्रे येथील इन्फ्लुएंट पंपिंग स्टेशनमधील सर्व्हिस वॉटर पंपसेटचे एस.आय.टी.सी.** |
| निविदा विक्री | दि.१५.०६.२०२६, स.११.०० वा. पासून ते दि.२२.०६.२०२६ दु.१६.०० वा. पर्यंत |
| वेबसाईट | https://mahatenders.gov.in |
| संपर्क व्यक्ती | कार्यकारी अभियंता, यांत्रिकी (एस), वांद्रे विभाग |
| अ. नाव | श्री. ए. जे. चव्हाण |
| ब. दूर.क्र.(कार्यालय) | ०२२ २४४६४७५० |
| क. मोबाईल क्र. | ८७७९२७०५७५ |
| ड. ई-मेल आयडी | ipsbandra@gmail.com |

सही/-
पीआरओ/५६९/जाही./२०२६-२७ उप मुख्य अभियंता (एस.ओ.), शहर (आय/सी)

खिडक्यांसाठी जाळ्यांचा आणि मच्छरदाण्यांचा वापर करा



**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित**
**(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची कंपनी)**
**CIN No. : U70200MH1998SGC116664**
५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१
दुरध्वनी क्र. ०२२-६९२०६९२०
ई-मेल : sppl_mumbai@rediffmail.com Website: www.spplmmr.org

**ई-निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२७ (ऑनलाईन)**

व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, ५वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) ४०००५१ हे, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित अंतर्गत खालील कामासाठी, निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या पात्रता निकषांनुसार पात्र निविदाकारांकडून **'बी-२'**/एसबीडी नमुन्यातील ऑनलाईन ई-निविदा मागवत आहेत. आहेत. निविदा दस्तऐवज http://mahatenders.gov.in या पोर्टलवरून डाऊनलोड करता येतील.

कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांनी राखून ठेवला आहे. अटी- शर्तीच्या अधीन असलेल्या (conditional) निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of the work - Construction of sale building no. S - 34 consisting of 208 tenements in Slum Rehabilitation Scheme at Turbhe Mandale, Mankhurd on land bearing CTS No. 6/1B/1, 6/1B/2, 6/1B / 3 & 6/1B/4 of village Mandale, Mankhurd, M/E ward under clause 3.11 read with clause 3.19 and 3.5 of Appendix-IV DCR 33(10) | Rs. 58,36,58,595/- |

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १६/०६/२०२६ ते १०/०७/२०२६ |
| निविदा सादर करण्याचा अतिंम दिनांक व वेळ | :- | दि. १०/०७/२०२६ १८.०० Hrs. पर्यंत |
| निविदा पूर्व चर्चा बैठक स्थळ, दिनांक व वेळ | :- | २४/०६/२०२६ १५.०० hrs.<br>व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय, ५ वा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ |
| निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | :- | १३/०७/२०२६ रोजी १२.०० hrs. onwards |

निविदा सूचनेबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
**mahatenders.gov.in**
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल).
२. कार्यकारी अभियंता,शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित, मुंबई-४०००५१ कार्यालयातील सूचना फलक.

सही/-
(लहूराज माळी)
व्यवस्थापकीय संचालक
शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

क्रमांक: आरओसी-२०२६-२७/क्र-५/सी ११२६



**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)

**दीर्घ डायमण्ड प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | दीर्घ डायमण्ड प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | २९ मे, २०१३ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U36910MH2013PTC305270 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता (जर असल्यास) | एचडब्ल्यू-२०९२ भारत डायमण्ड बोर्स, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१, महाराष्ट्र भारत. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | दि. ९ जून, २०२६ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | दि. १० जून, २०२६ |
| ८ | परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | श्री. अतुल मेहता<br>IBBI/IPA-002/IP-N01062/2020-2021/13458 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | २०१-२०६, शिव स्मृति चेंबर्स, २रा मजला, ४९ए, डॉ. ॲनी बेझंट रोड, कॉर्पोरेशन बँकच्या वर, वरळी, मुंबई - ४०००१८, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००१८.<br>csatulmehta@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | २०१-२०६, शिव स्मृति चेंबर्स, २रा मजला, ४९ए, डॉ. ॲनी बेझंट रोड, कॉर्पोरेशन बँकच्या वर, वरळी, मुंबई - ४०००१८, मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००१८.<br>liq.dirghdiamond@gmail.com |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण मुंबई खंडपीठ यांनी (संकेताच्या कलम ३३ अन्वये परिसमापन) दि. १० जून, २०२६ रोजी दीर्घ डायमण्ड प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

दिनांक: १५ जून, २०२६
ठिकाण: मुंबई

श्री. अतुल मेहता
दीर्घ डायमण्ड प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
IBBI/IPA-002/IP-N01062/2020-2021/13458
एएफए : दि. ३० जून, २०२६



**फॉर्म जी**
**मुंबई, महाराष्ट्र येथे रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत**
**राजेश सिटीस्पेसेस प्रायव्हेट लिमिटेड**
**करिता स्वारस्य अभिव्यक्तीचे आमंत्रण**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६(ए) च्या उप-विनियमन (१) अन्वये)

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव व पॅन आणि सीआयएन / एलएलपी क्र. | राजेश सिटीस्पेसेस प्रायव्हेट लिमिटेड;<br>पीएएन: AAFCR9635L<br>सीआयएन: U70109MH2012PTC232929 |
| २. | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | १३९, सेकसरिया चेंबर्स, २रा मजला, नगिनदास मास्टर रोड, फोर्ट, मुंबई-४००००१. |
| ३. | वेबसाईटचे यूआरएल | उपलब्ध नाही. |
| ४. | बहुसंख्य अचल संपत्ती असलेल्या जागेचा तपशील | कैलाश निवास, ३५३-४ए, आरबी मेहता मार्ग, जयगायत्री को-ऑप हौसिंग सोसायटी, सिंधू वाडी, घाटकोपर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०००७७. |
| ५. | मुख्य उत्पादने/सेवांची स्थापित क्षमता | लागू नाही |
| ६. | गत वित्तीय वर्षामध्ये विक्री झालेल्या मुख्य उत्पादने/सेवांचे परिमाण आणि मूल्य | शुन्य |
| ७. | कर्मचारी/कामगारांची संख्या | शुन्य |
| ८. | गत उपलब्ध दोन वर्षांची वित्तीय विवरणपत्रे (वेळापत्रकासह), धनकोंची यादी समाविष्ट असलेले पुढील तपशीलांची उपलब्धताः | cirp.rajeshcity@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील |
| ९. | संकेताच्या कलम २५(२)(एच) अन्वये ठराव अर्जदारांकरिता पात्रता | cirp.rajeshcity@gmail.com येथे ईमेल पाठवून तपशील प्राप्त करता येतील |
| १०. | स्वारस्य अभिव्यक्ती स्वीकारण्याकरिता अंतिम दिनांकः | २४.०६.२०२६ |
| ११. | संभाव्य ठराव अर्जदारांची तात्पुरती यादी पारित करण्याचा दिनांक | २५.०६.२०२६ |
| १२. | तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३०.०६.२०२६ |
| १३. | संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम यादी पारित करण्याचा दिनांक | ०१.०७.२०२६ |
| १४ | संभाव्य ठराव अर्जदारांना माहिती निवेदनपत्रिका, मुल्यांकन नमुना, ठराव योजनेकरिता विनंती पारित करण्याचा दिनांक | ०३.०७.२०२६ |
| १५. | ठराव योजना सादरीकरणाचा अंतिम दिनांक | १८.०७.२०२६ |
| १६. | ईओआयकडे सादर करण्यासाठी प्रक्रिया ईमेल आयडी | cirp.rajeshcity@gmail.com |
| १७. | कॉर्पोरेट ऋणकोच्या एमएसएमई म्हणून नोंदणी स्थितीचे तपशील | UDYAM-MH-19-0312018 |

**टीपः संकेताच्या कलम २९ए अन्वये अपात्र व्यक्ती स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यास अपात्र असेल. कलम २९ए च्या तपशिलवार खंडाकरिता, तुम्ही www.ibbi.gov.in वर पाहू शकता.**
स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय)च्या आमंत्रणाशी संबंधी प्रक्रिया आणि ठराव योजनेचे सादरीकरण/विचारात घेणे हे माननीय एनसीएलटीद्वारे सीआयआरपी विनियमनांच्या विनियमन ४०एफ नुसार सीआयआरपी कालावधीचा विस्तार किंवा सीआयआरपी प्रक्रिया पुन्हा सुरू करणे/पुनरुज्जीवित करणे यास मंजुरीच्या अधीन आहे.

दिनांक: १५.०६.२०२६
ठिकाण: अहमदाबाद


ए विनोद ताराचंद अग्रवाल
आरपी-राजेश सिटीस्पेसेस प्रायव्हेट लिमिटेड सीआयआरपीमध्ये
नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00641/2017-18/11090
एएफए वैधता - ३०.०६.२०२७
२०४, वॉल स्ट्रीट-१, गुजरात कॉलेजजवळ, एलिसब्रिज, अहमदाबाद - ३८०००६.

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in



## अहान-अनीतमध्ये काहीतरी शिजतंय?

**'सैयारा'** या ब्लॉकबस्टर चित्रपटातून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी बॉलिवूडची नवी जोडी अहान पांडे आणि अनीत पड्डा सध्या सोशल मीडियावर प्रचंड चर्चेत आली आहे. व्हायरल झालेल्या त्यांच्या काही नवीन छायाचित्रांमध्ये या दोघांच्याही गळ्याच्या पाठीमागील भागावर एकसारखेच हुबेहूब टॅटू दिसून आले आहेत. यामुळे त्यांच्यात प्रेमसंबंध सुरू असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. व्हायरल फोटोंमुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. युजर्सनी केलेल्या दाव्यानुसार, या दोघांनीही आपल्या गळ्याच्या मागे 'नॉर्थ स्टार' म्हणजेच ध्रुवताऱ्याचे हुबेहूब डिझाईन कोरले आहे. ध्रुवतारा हा योग्य दिशा आणि मार्ग दाखवण्याचे प्रतीक मानला जातो. अनेकांनी या जोडप्याला फॉरेव्हर गोल्स आणि क्युट जोडी अशा कमेंट्स दिल्या आहेत, तर काहींनी हा केवळ त्यांच्या आगामी चित्रपटाच्या प्रसिद्धीचा भाग असू शकतो असाही संशय व्यक्त केला आहे. या टॅटूचा नेमका अर्थ काय आहे किंवा त्यांच्यात खरंच प्रेमसंबंध आहेत का, याबाबत अहान पांडे किंवा अनीत पड्डा या दोघांनीही अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही.



## साचेबद्धपणातून बाहेर पडताना....

**मराठी** आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेत्री सई ताम्हणकर हिने आपल्या अभिनय प्रवासात 'टाईपकास्टिंग' म्हणजेच एकाच साच्यातील भूमिका मिळणे या आव्हानाचा कसा सामना केला आणि स्वतःची नवी ओळख कशी निर्माण केली, यावर एका मुलाखतीत उघडपणे भाष्य केले आहे. 'दुनियादारी', 'क्लासमेट्स', 'वजनदार' आणि 'वायझेड' अशा मराठी सुपरहिट चित्रपटांनंतर तिने हिंदीमध्ये 'हंटर', 'मिमी', 'भक्षक' आणि 'इंडिया लॉकडाऊन' यांसारख्या वैविध्यपूर्ण प्रोजेक्ट्समधून स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. सईच्या मते, चित्रपटसृष्टीत टाईपकास्टिंगची समस्या अजूनही कायम आहे. जेव्हा एखादी भूमिका आणि चित्रपट यशस्वी होतो, तेव्हा अनेक दिग्दर्शक त्याच प्रकारच्या भूमिका घेऊन तुमच्याकडे येतात. या चक्रातून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अशा भूमिकांना थेट 'नाही' म्हणणे, जे कोणत्याही कलाकारासाठी अत्यंत कठीण असते. नकाराचा मोठा व्यावसायिक आणि भावनिक फटका बसतो, हातून अनेक प्रोजेक्ट निघून जातात आणि खूप मोठी जोखीम निर्माण होते. कलाकारासाठी काम नाकारणे अत्यंत वेदनादायी असते. तरीही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची पुनर्रचना करण्यासाठी हा निर्णय घ्यावाच लागतो, असे सई सांगते.

'हंटर' या हिंदी चित्रपटानंतर सईला सलग तीन वर्षे तशाच प्रकारच्या भूमिकांच्या ऑफर्स येत होत्या, पण तिने त्या सर्व नाकारल्या. सईने सांगितले की, जर तिने स्वतःला त्या साच्यात पुन्हा पुन्हा रिपीट केले असते, तर इतरांनीही तिला वेगळ्या भूमिकेत पाहणे बंद केले असते.




## तीन दशकांनंतर पुन्हा एकत्र

**अभिनेता** सनी देओल आणि अक्षय खन्ना यांच्यातील हाय-व्होल्टेज संघर्षावर आधारित 'इक्का' या नवीन कोर्टरूम थ्रिलर चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर येत्या १० जुलै २०२६ रोजी या चित्रपटाचा भव्य प्रीमियर होणार आहे. हा चित्रपट एका प्रख्यात आणि प्रामाणिक वकिलाभोवती फिरतो, ज्याची भूमिका सनी देओल यांनी साकारली आहे. भूतकाळातील काही प्रसंगामुळे ज्या व्यक्तीची कारकीर्द या वकिलाने उद्ध्वस्त केलेली असते. अशाच एका हत्येचा संशयित आरोपी असलेल्या व्यक्तीची (अक्षय खन्ना) केस लढण्यासाठी या वकिलाला भाग पाडले जाते. या कायदेशीर लढाईदरम्यान सत्य, न्याय, वैयक्तिक निष्ठा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांच्यात मोठी कोंडी निर्माण होते. जे. पी. दत्ता यांच्या १९९७ मधील 'बॉर्डर' या ऐतिहासिक युद्धपटानंतर तब्बल २९ वर्षांनी सनी देओल आणि अक्षय खन्ना ही जोडी पुन्हा एकदा स्क्रीनवर एकत्र येत आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून सनी देओल यांचे ओटीटी प्लॅटफॉर्मवर पदार्पण होत आहे.



## कंगनाच्या चित्रपटासाठी भन्नाट ऑफर

**अभिनेत्री** आणि खासदार कंगना रणौतची मुख्य भूमिका असलेल्या 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी एक विशेष योजना सुरू केली आहे. १२ जून २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या निर्मात्यांनी देशभरातील चित्रपटप्रेमींसाठी एका तिकिटावर एक तिकीट मोफत ही आकर्षक सवलत जाहीर केली आहे. चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांची संख्या वाढवण्यासाठी आणि कुटुंबांना आकर्षित करण्यासाठी हा पर्याय निवडण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

मनोज तपडिया यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या सत्य घटनांवर आधारित आहे. मात्र, यात केवळ हल्ल्याऐवजी मुंबईतील कामा हॉस्पिटलमधील डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या अचाट धैर्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. संकटाच्या काळात स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता सुमारे २० गरोदर महिलांचे प्राण वाचवणाऱ्या परिचारिका अंजली कुलथे यांच्या वास्तविक शौर्यापासून प्रेरित होऊन हे कथानक गुंफण्यात आले आहे. कंगना रणौतसोबत या चित्रपटात गिरीजा ओक-गोडबोले, स्मिता तांबे आणि ईशा डे यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. नवीन ऑफरमुळे चित्रपटगृहांमध्ये प्रेक्षकांचा प्रतिसाद वाढेल, अशी आशा निर्मात्यांना आहे.

## 'कॉकटेल २' केवळ प्रौढांसाठीच!

**शहीद कपूर,** कृती सनॉन आणि रश्मिका मंदाना यांची मुख्य भूमिका असलेल्या 'कॉकटेल २' या बहुप्रतिक्षित चित्रपटाला सेन्सॉर बोर्डाकडून 'ए' म्हणजेच केवळ प्रौढांसाठीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. १५० मिनिटे (२ तास ३० मिनिटे) कालावधी असलेल्या या चित्रपटाला मिळालेले हे प्रमाणपत्र दोन्ही आघाडीच्या अभिनेत्रींसाठी एक वेगळा टप्पा ठरले आहे. कृती सनॉन आतापर्यंत ती प्रामुख्याने कौटुंबिक आणि रोमँटिक-कॉमेडी चित्रपटांमध्ये दिसली आहे. 'ए' प्रमाणपत्र दिलेला कारकिर्दीतील तिचा हा पहिलाच चित्रपट आहे. रश्मिकाच्या 'ॲनिमल' चित्रपटाला 'ए' प्रमाणपत्र मिळाले होते. त्यामुळेच तिचा अशा धाटणीचा हा दुसरा चित्रपट आहे. चित्रपटाची गाणी आणि ट्रेलरला आधीच सोशल मीडियावर जोरदार प्रतिसाद मिळाला असून, हा चित्रपट येत्या १९ जून २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे.





## ट्रेलरने वाढवली उत्सुकता

**'धमाल ४'**या बहुप्रतिक्षित विनोदी चित्रपटाचा ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांना पुन्हा एकदा हास्याचा मनोरंजक प्रवास अनुभवायला मिळणार आहे. दिग्दर्शक इंद्र कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट येत्या १० जुलै २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या वेळची कथा एका अथांग सोन्याच्या खजिन्याभोवती आणि रहस्यमय साहसाभोवती फिरते. यामध्ये नेहमीप्रमाणेच संभ्रम, स्पर्धा आणि अटीतटीची लढत पाहायला मिळेल. ट्रेलरमध्ये दाखवल्याप्रमाणे या प्रवासात समुद्री चाच्यांची टोळी (ज्याचे नेतृत्व रवी किशन करत आहेत) आणि काही थरारक स्टंट्स पाहायला मिळतील. ट्रेलर लाँच दरम्यान अर्शद वारसी आणि जावेद जाफरी यांनी सांगितले की, चित्रपटातील डोंगरकड्याचा एक महत्त्वाचा आणि अत्यंत धोकादायक स्टंट महाराष्ट्रातील माळशेज घाट येथे प्रत्यक्ष लोकेशनवर शूट करण्यात आला आहे. कोणतीही संगणकीय ग्राफिक्स न वापरता हा सीन अत्यंत जोखमीचा होता आणि अजय देवगणच्या मदतीने हा स्टंट नियोजित वेळेपेक्षा खूपच कमी वेळात पूर्ण करण्यात आला.

---

# हेल्दी Me

## यकृताची जादुई क्षमता

**सध्याच्या** काळात यकृताचे आजार ही एक मोठी सार्वजनिक आरोग्य समस्या बनली आहे. लान्सेटच्या एका अहवालानुसार, भारतातील जवळपास ३८.९ टक्के प्रौढ नागरिक 'मेटाबॉलिकली डायसरेग्युलेटेड नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज' या आजाराने ग्रस्त आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगभरात हिपॅटायटीस बी मुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी ६९ टक्के मृत्यू भारतात होतात. लठ्ठपणा आणि मधुमेह यांसारख्या आधुनिक जीवनशैलीशी संबंधित समस्यांचा थेट संबंध यकृताच्या आरोग्याशी जोडलेला आहे. वास्तविक, मानवी शरीरातील यकृतामध्ये इतर अवयवांच्या तुलनेत स्वतःची पुनर्निर्मिती करण्याची आणि झालेल्या नुकसानीतून स्वतःला बरे करण्याची एक अद्भूत नैसर्गिक क्षमता असते. शरीरातील इतर अवयवांना दुखापत होते, तेव्हा तिथे निरुपयोगी व्रण तयार होतात. परंतु, यकृत स्वतःचे निकामी झालेले भाग पुन्हा जसेच्या तसे तयार करू शकते. यामधील मुख्य कार्यरत पेशींना 'हेपेटोसाइट्स' म्हणतात. यकृताला दुखापत झाल्यास किंवा शस्त्रक्रियेद्वारे त्याचा काही भाग काढल्यास या पेशी वेगाने विभागल्या जातात आणि नवीन पेशी तयार करतात. यादरम्यान, शरीरातील चयापचय प्रक्रिया खंडित न होता सुरू राहावी यासाठी यकृताच्या निरोगी पेशींचा आकार वाढतो. काही कालावधीत यकृत त्याचा मूळ आकार आणि कार्यक्षमता पूर्णपणे परत मिळवते. सायटोकाईन्स आणि विशिष्ट ग्रोथ फॅक्टर्स या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवतात. यकृताची पुनर्निर्मिती अत्यंत शिस्तबद्ध प्रक्रिया असून ती ३ टप्प्यांत पार पडते.



प्रारंभिक टप्पा: यकृताला दुखापत झाल्यानंतर किंवा शस्त्रक्रिया झाल्यावर अवघ्या काही तासांत हा टप्पा सुरू होतो. शरीरातील विशिष्ट प्रथिने (उदा. ट्यूमर नेक्रोसिस फॅक्टर अल्फा आणि इंटरल्युकिन ६) हेपेटोसाईटस् पेशींना नवीन पेशी तयार करण्यासाठी तयार करतात. प्रसरण टप्पा: या टप्प्यात हेपेटोसाइट ग्रोथ फॅक्टर आणि एपिडर्मल ग्रोथ फॅक्टर हे पेशींच्या जलद विभाजनाला गती देतात. यामुळे खराब झालेल्या ऊतींची जागा नवीन निरोगी ऊती घेतात.

**अंतिम टप्पा :** पेशींची अमर्याद वाढ शरीरासाठी घातक ठरू शकते. त्यामुळे, यकृत त्याच्या आवश्यक आकारात आल्यानंतर 'ट्रान्सफॉर्मिंग ग्रोथ फॅक्टर बीटा' सारखे मार्ग या पेशीविभाजनाच्या प्रक्रियेला सुरक्षितपणे थांबवतात. यकृत किती दिवसांत बरे होईल, हे त्याला झालेल्या नुकसानीच्या तीव्रतेवर अवलंबून असते. शस्त्रक्रियेद्वारे यकृताचा भाग कापला असल्यास, एक निरोगी यकृत ३० ते ६० दिवसांत त्याचा मूळ आकार परत मिळवू शकते. फॅटी लिव्हरच्या समस्येमध्ये, योग्य आहार आणि नियमित व्यायामासारख्या जीवनशैलीतील बदलांमुळे ६ ते ८ आठवड्यांत यकृत सामान्य होऊ शकते.

अल्कोहोलिक हिपॅटायटीस (दारूमुळे आलेली सूज) असल्यास, मद्यसेवन पूर्णपणे बंद केल्यास ३ ते ६ महिन्यांत यकृताच्या कार्यात लक्षणीय सुधारणा होते.

### लक्षात ठेवा

यकृताची पुनर्निर्मिती करण्याची क्षमता अफाट असली तरी त्यालाही एक मर्यादा आहे. यकृतावर सतत विषारी घटकांचा (उदा. अति प्रमाणात दारू पिणे) मारा होत राहिला किंवा दीर्घकाळ विषाणूजन्य संसर्ग राहिला, तर यकृतावर कायमस्वरूपी जखमा होतात. या गंभीर स्थितीला 'लिव्हर सिरोसिस' म्हणतात. सिरोसिसच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर यकृताची स्वतःला बरे करण्याची क्षमता कायमची नष्ट होते.





सिमंधर महानारायण वात बाम
एक प्रभावी उपाय
अकडन कंबर दुखी
सांधे दुखी पाठ दुखी
To Order Scan Here
Simandhar
HELPLINE NO .: 7045355632

## आतड्यांसाठीच्या उपयुक्त चाचण्या

*सतत जाणवणारे पोट फुगणे किंवा गॅस होणे (ब्लोटिंग) हे केवळ खाण्यापिण्याच्या सवयींमुळे नसून आतड्यांमधील बिघाडाचे लक्षण असू शकते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक प्रौढ व्यक्ती पोटाच्या अशा समस्यांनी त्रस्त असतात. या समस्येचे मूळ कारण शोधण्यासाठी काही महत्त्वाच्या वैद्यकीय चाचण्या उपयुक्त ठरतात.*

**फूड इन्टॉलरन्स टेस्ट :** अनुवंशिक किंवा इतर कारणांमुळे विशिष्ट अन्नपदार्थ पचवणे शरीराला कठीण जाते. या चाचणीद्वारे लॅक्टोज किंवा ग्लूटेन (गव्हातील प्रोटीन) यांसारख्या घटकांमुळे पोट फुगते का, हे अचूक समजते आणि त्यानुसार आहारात बदल करणे शक्य होते.

**गट मायक्रोबायोम टेस्ट :** यामध्ये पोटातील चांगल्या आणि वाईट जीवाणूंच्या (बॅक्टेरिया) प्रमाणाचे विश्लेषण केले जाते. जीवाणूंचे संतुलन बिघडल्यास पोटाचे विकार वाढतात, ज्याचे निदान या चाचणीद्वारे होते.



**ब्रीथ टेस्ट फॉर सीबो :** या नॉन-इन्व्हेसिव्ह चाचणीत रुग्णाला ग्लुकोजचे पाणी प्यायला देऊन त्याच्या श्वासातील हायड्रोजन आणि मिथेन वायूचे प्रमाण मोजले जाते. वायूचे वाढलेले प्रमाण आतड्यात अतिरिक्त जीवाणू असल्याचे दर्शवते, ज्यामुळे गॅस आणि पोट फुगण्याचा त्रास होतो.

**स्टूल टेस्ट :** जेव्हा पोट फुगण्याचा त्रास जुनाट किंवा तीव्र स्वरूपाचा असतो तेव्हा डॉक्टर ही चाचणी सुचवतात. यातून आतड्यातील संसर्ग, सूज किंवा इतर गंभीर पचनविकारांचे स्पष्ट निदान होते.

**एंडोस्कोपी किंवा इमेजिंग चाचण्या :** सतत किंवा गंभीर त्रास असल्यास एका लवचिक नळीला लहान कॅमेरा जोडून आतड्याच्या आतील भागाची तपासणी केली जाते. यामुळे अल्सर, अंतर्गत सूज किंवा रचनात्मक दोष स्पष्टपणे दिसतात आणि अचूक उपचार करणे सोपे होते. वारंवार पोट दुखणे, अचानक पोट फुगणे, मलविसर्जनाच्या अनियंत्रित सवयी आणि सतत येणारा थकवा ही या चाचण्या करून घेण्याची मुख्य लक्षणे आहेत.

## ग्लिसरीन वापरताना...

*त्वचेची काळजी घेण्यासाठी आणि ती मऊ ठेवण्यासाठी महागड्या उत्पादनांऐवजी ग्लिसरीन (ज्याला ग्लिसरॉल असेही म्हणतात) हा एक अत्यंत साधा आणि प्रभावी पर्याय मानला जातो. ग्लिसरीन हे रंगहीन, गंधहीन आणि सिरपसारखे घट्ट असणारे नैसर्गिक द्रव असून ते वनस्पती आणि प्राण्यांच्या चरबीपासून मिळते. सौंदर्यप्रसाधनांमध्ये प्रामुख्याने वनस्पतींपासून बनवलेले ग्लिसरीन वापरण्याचा सल्ला दिला जातो.*

ग्लिसरीन हे एक उत्तम 'ह्युमेक्टंट' आहे. म्हणजेच ते हवेतील आणि त्वचेच्या आतील स्तरांमधील ओलावा खेचून घेते आणि तो त्वचेच्या बाह्य स्तरावर टिकवून ठेवते. यामुळे त्वचा कोरडी पडत नाही. हे केवळ त्वचेला हायड्रेट करत नाही, तर त्वचेची लवचिकता सुधारून ती अधिक मऊ आणि लवचिक बनवते. त्वचेचा बाह्य स्तर मजबूत करते, ज्यामुळे बाहेरील प्रदूषण आणि हानिकारक घटकांपासून त्वचेचे रक्षण होते. तसेच, ते मृत पेशी काढून टाकण्यास आणि त्वचेची नैसर्गिक दुरुस्ती प्रक्रिया वेगवान करण्यास मदत करते.

संवेदनशील किंवा जळजळ होणाऱ्या त्वचेला शांत करण्याचे गुणधर्म ग्लिसरीनमध्ये असतात. तसेच यात सौम्य सूक्ष्मजीवविरोधी (अँटी-मायक्रोबियल) प्रभाव देखील असतो.




वापरताना घ्यायची काळजी

ग्लिसरीन कधीही थेट (१०० टक्के शुद्ध स्वरूपात) चेहऱ्यावर लावू नये. कारण ते खूप चिकट असते आणि कोरड्या हवामानात ते त्वचेच्या खोल स्तरांमधून पाणी शोषून घेते, ज्यामुळे त्वचा अधिक कोरडी किंवा ताणलेली वाटू शकते.

क्लिन्झर म्हणून वापरताना नियमित फेस वॉशमध्ये १-२ थेंब ग्लिसरीन मिसळावे. टोनर म्हणून वापरताना १ भाग ग्लिसरीन आणि ४-५ भाग गुलाबपाणी किंवा साधे पाणी एकत्र करून चेहऱ्यावर लावावे. मॉइश्चरायझर म्हणून वापरताना नियमित क्रीममध्ये १-२ थेंब मिसळून ओल्या त्वचेवर लावावे.

अत्यंत संवेदनशील त्वचा असलेल्या लोकांना ग्लिसरीनमुळे सौम्य जळजळ, खाज किंवा लालसरपणा येऊ शकतो. जास्त प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने वापरल्यास चेहऱ्याची छिद्रे (पोअर्स) बंद होऊ शकतात.

ग्लिसरीन त्वचेचा रंग गोरा करत नाही किंवा टॅनिंग पूर्णपणे काढून टाकत नाही, तर ते त्वचेला निरोगी आणि हायड्रेट ठेवून तिचा पोत सुधारते. पण तुम्हाला एक्झिमा, सोरायसिस किंवा तीव्र मुरुमांचा त्रास असेल, तर ग्लिसरीन वापरण्यापूर्वी त्वचाविकार तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

## गॉयटरची समस्या

*गलगंड (गॉयटर) म्हणजे गळ्याच्या समोरील भागात असणाऱ्या थायरॉईड ग्रंथीला आलेली अपवादात्मक सूज होय. ही समस्या नेहमीच धोकादायक नसते. परंतु यामुळे गळ्यापाशी अस्वस्थता येणे, सूज दिसणे आणि काही वेळा घास गिळण्यास किंवा श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. सौम्य स्वरूपाचा गलगंड असल्यास काही नैसर्गिक आणि जीवनशैलीतील बदलांच्या आधारे ग्रंथीची सूज कमी करण्यास आणि लक्षणे नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.*

### या समस्येचे व्यवस्थापन करण्यासाठी


मूळ कारणाचा शोध: नैसर्गिक उपायांचा विचार करण्यापूर्वी गलगंड नेमका कशामुळे झाला आहे, हे जाणून घेणे गरजेचे आहे. शरीरात आयोडीनची कमतरता, 'हाशिमोटो' किंवा 'ग्रेव्हज' सारखे थायरॉईडचे ऑटोइम्यून आजार, हार्मोन्सचे असंतुलन किंवा थायरॉईडवरील गाठी (नोड्यूल्स) यामुळे हा त्रास होऊ शकतो. त्यामुळे डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे हा पहिला टप्पा आहे.

आयोडीनचे योग्य प्रमाण: थायरॉईड ग्रंथीच्या निरोगी कार्यासाठी आयोडीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ज्या भागात अन्नातून आयोडीन कमी मिळते, तिथे गलगंड होण्याचे प्रमाण जास्त असते. यासाठी आहारात समुद्री शेवाळ (सीवीड), मासे, दुग्धजन्य पदार्थ आणि आयोडीनयुक्त मिठाचा समावेश करणे फायदेशीर ठरते. मात्र, आयोडीनचे अतिरिक्त प्रमाण देखील थायरॉईडची समस्या वाढवू शकते, त्यामुळे त्याचे संतुलन राखणे आवश्यक आहे. पोषक घटकांचे संतुलन: थायरॉईडच्या आरोग्यासाठी इतर खनिजेही महत्त्वाची भूमिका बजावतात. ब्राझील नट्स आणि सूर्यफुलाच्या बियांमध्ये आढळणारे 'सेलेनियम' हे खनिज थायरॉईडची सूज कमी करण्यास मदत करू शकते. याशिवाय हार्मोन्सच्या निर्मितीसाठी आणि रोगप्रतिकारक शक्तीसाठी झिंक आणि लोह आवश्यक असते. यासाठी फळे, भाज्या आणि प्रथिनेयुक्त संतुलित आहाराचे सेवन करावे.ताणतणाव आणि सूज नियंत्रण: जुनाट मानसिक ताण आणि शरीराअंतर्गत असणारी सूज यामुळे थायरॉईडचे विकार बळावू शकतात. शरीरातील हार्मोन्सचे संतुलन राखण्यासाठी आणि ताण कमी करण्यासाठी योग, ध्यान (मेडिटेशन), दीर्घ श्वसन आणि



हलका व्यायाम करावा. तसेच प्रक्रियेतून तयार झालेले अन्नपदार्थ (प्रोसेस्ड फूड) आणि साखरेचे प्रमाण कमी केल्यास शरीरातील सूज कमी होण्यास मदत होते. आयुर्वेद आणि पर्यायी वैद्यकीय उपचार पद्धतींमध्ये थायरॉईडच्या आरोग्यासाठी अश्वगंधा आणि ब्लॅडररॅक यांसारख्या वनस्पतींचा वापर पारंपरिक काळापासून केला जातो. परंतु, जर आधीपासूनच थायरॉईडची औषधे सुरू असतील, तर या वनस्पतींचा वापर केवळ तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करावा. कारण नैसर्गिक घटकांचा औषधांवर परिणाम होऊ शकतो.

## नवाकाळ शब्दकोडे-१६३७



**आडवे शब्द –**

१. दोरखंड ३. 'माहेरची साडी' चित्रपटाची नायिका- xxx कुबल ५. नाना प्रकारचे ७. सत्त्व; कसोटी ९. सावध ११. गुणांची कदर करणारा १२. नीरवता १३. प्राणप्रिय, लाडका १५. पुन्हा, फिरून १६. उपवन, बाग १७. नवरदेवाची आई १९. परीट २१. जल २२. सुंदर युवती २४. अशाश्वत, भंगुर २६. तराजूचा प्रकार २७. सांज ३१. वैपुल्य, विपुलता ३३. गिरी, शैल, डोंगर ३५. पिता, बाप ३६. आटोपशीर आकाराचे व सुंदर ३७. बालकथेतला सात सागरी सफरी करणारा दर्यावर्दी ३९. मडक्याचा तुकडा ४०. थाटमाट ४२. शरीर ४३. अर्धा शेर, एक पौंड ४५. बुद्धी ४७. फुलाची पाकळी ४८. शस्त्राचा आघात ४९. नियंत्रण ५१. ज्ञात, ठाऊक ५४. व्रतात मग्न ५६. प्रामाणिकपणा ५७. वर्षाव, सरबत्ती ५९. दुष्ट बेत ६०. आशादायक स्थिती ६३. टिकाव धरणे ६४. विलंब ६६. स्वतःच्या मर्जीने ६९. निर्बुद्ध ७०. अनुकूल काळ ७२. वेगवान, भरधाव ७४. रागाचा उद्रेक ७६. उमाळा ७९. कृष्णाचे बालपण गेले ते स्थान, गोकुळ ८१. भांड्याची किंवा कापडाची किनार ८३. वेळू, बांबू ८५. मागाहून, नंतर ८७. विवाहितेच्या आईवडिलांचे घर ८९. पडदे वगैरेसाठीच्या जाड्याभरड्या कापडाचा प्रकार ९०. पोपट, रावा ९१. हिरव्या वाटाण्याचे कालवण ९३. देवालय ९४. पाण्याचा कण, तुषार ९५. कुरघोडी ९६. आकाश, गगन ९८. समोर, पुढ्यात असलेला १००. दुकानातले कापडाचे अखंड ठाण १०२. अमृत; दह्याचे शीतपेय १०४. जाणूनबुजून १०५. निकटचे नाते १०७. कुवत, आवाका १०९. चावा, दंश ११०. स्वाद, आनंद १११. पिठाची गिरणी ११२. फसवणे

**उभे शब्द –**

१. विटेवर उभ्या विठ्ठलाचे एक वर्णन २. रामाचा एक भाऊ ३. पादत्राणे नसलेला ४. शेतकरी ५. सोंग, लोकनाट्यातला एक भाग ६. सध्याचे ७. कपर्दिक ८. टोचणी, शल्य १०. तात्पुरते, अल्पकाल टिकणारे ११. चषक, करंडक १४. आवश्यकता १८. देवाने दिलेले २०. भारतीय सैनिक २१. मूळ; कानाची कड २३. ठोंब्या, ढ २५. आवाज, ध्वनी २६. तंबूचे जाड कापड २७. दिव्यदृष्टीने धृतराष्ट्राला युद्धाचे वर्णन सांगणारा २८. टेंभा, मशाल २९. समर्थ, बलवान ३०. चरबी ३२. मित्र ३४. मौजेचे, मजेदार ३६. डौलदार, कमनीय ३७. वनराज ३८. पायऱ्या असलेली विहीर, पुष्करणी ४१. साह्य, हातभार ४२. भीष्माचे मूळ नाव ४४. चमक, झिलई ४६. फटाके व स्वस्त मुद्रणासाठी प्रसिद्ध असलेले दक्षिणेचे गाव ५०. वीज, दामिनी ५२. एक शेंगभाजी ५३. धस; खुंट ५५. स्थान, जागा ५६. सुभाषचंद्र बोस यांची उपाधी ५८. थांगपत्ता ६०. शुभ्र, श्वेत ६१. तल्लीन ६२. बनारस, वाराणशी ६४. वीट, कंटाळा ६५. थोपवणे, विरोध ६६. जंगल, विपिन ६७. कमी उंचीचा ६८. भित्रा ७०. खंदक ७१. प्रखर, उग्र ७३. एक पालेभाजी; गार पाण्यासाठी मातीचे पात्र ७५. टपाल, पत्र ७७. कद्रू, कंजूष ७८. महिषी, म्हैस ८०. उत्पन्न, आय ८२. झुंजुमुंजू, पहाट ८३. डोके फुटणे ८४. लहान, छोटा ८६. प्रसन्न चेहऱ्याचा ८८. गणपतीचे एक नाव ८९. भक्तांचा समुदाय ९०. नियमित वावर ९१. दारुडा, दारूबाज ९२. पार्वतीचे एक नाव ९६. प्रभाव, सत्ता ९७. चांदी, रूपे ९९. हिंग १०१. फिर्याद, तक्रार १०३. खांब, स्तंभ १०६. शुक्राचार्यांचा लाडका शिष्य १०८. दह्याचे पाचक थंड पेय

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १६३६ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. अंत ३. हिमांशु ५. पराजय ७. कोरड १०. मरकत १२. भ्रतार १४. दाट १५. झपाट्याने १६. लकडा १८. बेजबाबदार २१. शान २२. दास २३. परागंदा २५. बैल २८. सदा २९. जरीला ३२. जादू ३३. व्रतबंध ३५. निरर्थक ३७. गटबाजी ४०. लढत ४२. दैत्य ४३. विमल ४४. वर ४५. वजा ४७. विस्तव ४९. अज्ञात ५०. शिडकावा ५२. तवा ५४. अधू ५५. जाग ५७. नरपशू ५९. वसन ६०. टकळी ६२. हवा ६३. तरणी ६४. ताट ६५. कणेर ६६. मचाण ६७. तरट ६९. वापर ७०. महसूल ७१. मेनका ७३. हाकामारी ७५. वारुणी ७७. सराटा ७९. हृदय ८०. मोद ८२. मालगाडी ८४. सेवाभावी ८६. निज ८७. सागर ८८. लोटी ८९. गवा ९०. वीरश्री ९१. हातवारे ९२. केचप ९४. टक ९६. जावळ ९८. मोकाट ९९. पाहुणेर १०१. तीनतेरा १०३. अकांडतांडव १०६. डूल १०७. चक्का १०८. गाडा १०९. लीलया

**उभे शब्द** : १. अंमलदार २. तरकस ३. हित ४. शुभ्र ५. परज ६. जवाब ७. कोट ८. डझन ९. कट्यार ११. कडा १३. ताबेदारी १४. दार १७. तेरा १९. बाह्य २०. दारा २१. शाल २३. पदार्थविज्ञान २४. गंज २५. बैदूल २६. श्रुत २७. बोध २८. सर ३०. लागवड ३१. अंबा ३३. व्रत ३४. बंदिस्त ३५. नित्य ३६. कमतरता ३८. टरकावणे ३९. जीव ४१. ढग ४२. दैवजात ४६. जात ४७. विधू ४८. वहिवाट ५०. शिशू ५१. वासरमणी ५३. वाटचाल ५४. अळी ५६. गरज ५८. पटवारी ६१. कण ६२. हरकारा ६५. करवादणे ६६. मसूर ६७. तनसडी ६८. केका ७२. सुहृद ७३. हायसे वाटणे ७४. मानभावी ७६. अलगद ७८. टापटीप ८१. काजवा ८२. मासा ८३. गार ८५. वीरगती ८६. नितळ ८८. लोचट ९१. हावरा ९२. केकावली ९३. सोपा ९५. करडू ९६. जाते ९७. तोडगा ९८. मोड १००. हुक्की १०२. नफा १०३. अक्का १०४. तांडा १०५. प्रिया

## मुरबाड नगरपंचायत ठेकेदारांकडून फलक लावण्यात टाळाटाळ

■ मुरबाड

**मुरबाड** नगरपंचायत हद्दीत एकूण १७ प्रभागांत अनेक विकासकामे झाली व सुरू आहेत. १७ प्रभागांत करोडो रुपयांची विकासकामे सुरू असताना या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी कामाचे नाव, मंजूर निधी, काम पूर्ण होण्याची तारीख, कोणती एजन्सी काम करत आहे व कधीची मंजुरी आहे असे फलक लावण्यासंबंधी मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी संबंधित ठेकेदारांना आदेश दिले होते. मात्र दोन महिने उलटूनही या आदेशाचे पालन होत नसल्याने ठेकेदार फलक लावण्यात टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे. मुरबाड नगरपंचायतचा नवीन विकास आराखडा मंजूर होण्यापूर्वी अनेक हरकती प्राप्त झाल्याने नवीन विकास आराखडा मंजूर करण्याचे सर्व प्रयत्न सुरू असताना जुन्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. शहरातील अनेक सुरू असलेली विकासकामे नवा आराखडा मंजूर झाल्यास निष्कासित करावे लागणार. त्यामुळे जनतेचा पैसा वाया जाणार आहे. हा पैसा वाया जाऊ नये तसेच लाखो रुपयांची गटारे व करोडो रुपयांची गार्डन व व्यायामाचे साहित्य बसविणे यासाठी खर्च होत असताना या विकासकामाच्या ठिकाणी विकासकामाचे सूचना दर्शक फलक लावण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

## बोरीवली स्थानकाचा पुनर्विकास करा संजय उपाध्यायांचे रेल्वेमंत्र्यांना पत्र

■ मुंबई

**बोरीवली** विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय उपाध्याय यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून बोरीवली रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणी आणि आधुनिकीकरणाच्या कामाला तातडीने गती देण्याची मागणी केली आहे. मुंबईतील सर्वाधिक वर्दळीच्या रेल्वे स्थानकांपैकी एक असलेल्या बोरीवली स्थानकातून दररोज सुमारे ४.५ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे प्रवाशांच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन पुनर्विकासाची प्रक्रिया लवकर सुरू करावी, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

आमदार उपाध्याय यांनी सांगितले की, पंतप्रधानांच्या अमृत भारत योजनेअंतर्गत बोरीवली स्थानकाच्या आधुनिकीकरण आणि पुनर्बांधणीला मंजुरी मिळालेली आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी विलंब न लावता सुरू करावी. याशिवाय पश्चिम रेल्वेशी संबंधित अनेक महत्त्वाच्या विषयांकडेही त्यांनी रेल्वेमंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. बोरीवली ते चर्चगेट मार्गावरील एसी लोकल गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी त्यांनी केली आहे. दिवसेंदिवस वाढणारी प्रवासी संख्या आणि एसी लोकलला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता या सेवांचा विस्तार आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

डहाणू रोड, विरार आणि बोरीवलीदरम्यान धावणाऱ्या मेमू गाड्यांच्या जागी आधुनिक लोकल सेवा सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. सध्या धावणाऱ्या मेमू गाड्यांमध्ये अस्वच्छता, जुने रॅक, अपुरा प्रकाश आणि वायुवीजनाच्या समस्या असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

## भीमाशंकर हेरिटेज वाडी सुनेत्रा पवार यांची पाहणी



■ बारामती

**श्रीक्षेत्र** भीमाशंकर परिसराचा धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या शाश्वत विकास साधण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या 'भीमाशंकर हेरिटेज वाडी' प्रकल्पाच्या जागेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पाहणी केली.

यावेळी त्यांनी भाविकांसाठी प्रस्तावित विविध सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. भीमाशंकरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्वाचा विचार करून विकास आणि संवर्धन यांचा समतोल राखत प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. भीमाशंकर हेरिटेज वाडी प्रकल्पामुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन होण्यास मदत होईल. ग्रामस्थांच्या जीवनमानात सुधारणा, भाविकांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होणे आणि पर्यटन विकासाला चालना मिळून संपूर्ण परिसराचे सकारात्मक परिवर्तन घडेल, असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.

यानंतर त्यांनी श्रीक्षेत्र भीमाशंकर येथे ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन आरती केली. एल निनोच्या संभाव्य संकटामुळे महाराष्ट्रातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, अशी प्रार्थनाही त्यांनी यावेळी केली.

## मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

■ मुंबई

**मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळाला आज बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल प्राप्त झाल्याने एकच खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीकडून आलेल्या या धमकीच्या मेलनंतर सुरक्षा यंत्रणा तातडीने सतर्क झाल्या असून, विमानतळ परिसरात कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली.

धमकीची माहिती मिळताच विमानतळ प्रशासन, स्थानिक पोलीस आणि बॉम्ब शोधक व नाशक पथक यांनी विमानतळ परिसराची सखोल तपासणी सुरू केली. प्राथमिक तपासणीत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नसल्याची माहिती आहे. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांत मुंबईत धमकीचे ई-मेल आणि फोन



येण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळ आणि ताज हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. तसेच दोन दिवसांपूर्वी मुंबई आणि पुण्याच्या महापौरांनाही धमकीचे ई-मेल प्राप्त झाले होते.

## गणपतीपुळेला जाणाऱ्या मित्रांचा अपघात! एकाचा मृत्यू

■ सातारा

**गणपतीपुळे** येथे जाणाऱ्या तीन मित्रांच्या कारचा कराड तालुक्यात भीषण अपघात झाला. यात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण जखमी झाले आहे. त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव येथील एका खासगी कंपनीत कार्यरत असलेले हे तिघे मित्र काल रात्री कोकणातील गणपतीपुळे येथे जाण्यासाठी निघाले होते. मध्यरात्रीच्या सुमारास कराड तालुक्यातील वडोली भिकेश्वर गावाजवळ त्यांची कार अचानक रस्त्यावर दोन ते तीन वेळा पलटी होऊन रस्त्यालगतच्या झाडीत जाऊन जोरात आदळली. अपघाताचा मोठा आवाज ऐकून स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अंधार व झाडीत अडकलेल्या कारमुळे बचावकार्य कठीण झाले होते. मात्र, ग्रामस्थांनी टॉर्चच्या सहाय्याने गाडीचे दरवाजे तोडून जखमींना बाहेर काढले आणि रुग्णालयात हलवले. या अपघातात ओंकार खंडागळेचा (२३) जागीच मृत्यू झाला. तो सध्या कामानिमित्त पाटण (सातारा) येथे वास्तव्यास होता. तर प्रशिक धावणे हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कराड येथील रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## मातोश्रीवर बैठक! सर्व खासदार उपस्थित?

पान १ वरून

मात्र त्यांनीही ऑनलाईन उपस्थिती दर्शवली. वाशिमचे खासदार संजय देशमुख यांच्या घरी मुलीच्या लग्नासंदर्भात तयारीमुळे ते देखील व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठकीत सहभागी झाले. नऊच्या नऊ खासदारांनी या बैठकीत सहभाग घेतला होता. (विनायक राऊत यांनी मात्र म्हटले की, लोकसभेच्या ९ खासदारांपैकी ८ खासदार बैठकीत उपस्थित होते.) या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी खासदारांना मार्गदर्शन केले. काही खासदार प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत, ते पुढील तीन दिवसांत मातोश्रीवर येऊन ठाकरे यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे माध्यमांनी अफवा पसरवू नयेत. संजय बंडू जाधव यांच्याशीही संवाद झाला असून, ते एक-दोन दिवसांत प्रत्यक्ष भेट घेतील.

अनिल देसाई म्हणाले की, मुंबईतील तीन आणि नाशिकचे राजाभाऊ वाजे असे चार खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते, तर पाच खासदारांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. काहींना वैयक्तिक कारणे होती. ओमराजे निंबाळकर यांचा मुलगा आजारी आहे, भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पत्नीवर हैदराबादमध्ये उपचार सुरू आहेत, तर संजय देशमुख यांच्या घरी लग्नाचे कार्य आहे. ही बैठक नियमित स्वरूपाची असून संघटनात्मक कामकाज, आंदोलनाची दिशा, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि कर्जमाफी यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. बैठकीनंतर या उलटसुलट माहितीमुळे उपस्थितीबद्दल संभ्रम आहे. त्यातच आज उपस्थित खासदार फुटणार नाहीत याची खात्री देता येत नाही. यामुळे येत्या काही दिवसांत राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होतो का, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## बंजी जंपवेळी दोरी जोडली नाही दरीत कोसळून तरुणीचा मृत्यू

■ साओ पाउलो

**ब्राझीलमध्ये** बंजी जंपिंगदरम्यान झालेल्या धक्कादायक निष्काळजीपणामुळे २१ वर्षीय तरुणीचा सुमारे १३० फूट खोल दरीत पडून मृत्यू झाला. उडी मारण्यापूर्वी सुरक्षा दोरी न जोडताच कर्मचाऱ्यांनी तिला पुलावरून खाली सोडल्याचा आरोप असून, या प्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

मृत तरुणीची ओळख मारिया एडुआर्डा रोड्रिग्ज डी फ्रीटास अशी झाली आहे. ती ब्राझीलमधील स्केलेटन ब्रिज येथे खासगी कंपनीतर्फे आयोजित बंजी जंपिंग उपक्रमात सहभागी झाली होती. घटनास्थळी चित्रीत झालेल्या व्हिडिओंमध्ये कर्मचारी मारियाला पुलाच्या कडेला घेऊन जाताना आणि नंतर खाली सोडताना दिसत आहेत. मात्र, त्यावेळी तिच्या शरीराला जोडली जाणारी मुख्य सुरक्षा दोरीच जोडलेली नव्हती, असे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मारिया खाली झेपावल्यानंतर उपस्थित नागरिकांना काहीतरी गंभीर चूक झाल्याचे लक्षात येते. त्यानंतर 'दोरी... दोरी जोडा' असा आरडाओरडा ऐकू येत असल्याचे दिसते. स्थानिक पोलिसांच्या माहितीनुसार, उडीदरम्यान तिचे वजन सांभाळणारी सुरक्षा दोरी शरीराला जोडण्यात आलेली नव्हती. त्यामुळे ती थेट खाली दरीत कोसळली.

## पतंजली सिव्हिल सर्व्हिसेस आता सिव्हिल सर्व्हिस अकादमी सुरू होणार

पान १ वरून

असते, असे ते म्हणाले. अकादमीत आध्यात्मिक ज्ञान, प्रशासकीय उत्कृष्टता आणि शैक्षणिक कठोरता यांचा समन्वय साधणारे 'त्रि-शिक्षण' मॉडेल राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अकादमीचा अभ्यासक्रम एनईपी म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भारतीय ज्ञान प्रणाली यांच्याशी सुसंगत असेल. 'वारसा आणि विज्ञान' तसेच 'ज्ञान आणि संशोधन' या तत्त्वांवर तो आधारित असेल. माजी आयएएस अधिकारी डॉ. एन. पी. सिंग यांनी सांगितले की, ही अकादमी प्रशासनाला वसाहतवादी मानसिकतेतून मुक्त करण्यास मदत करील आणि अधिकाऱ्यांना राज्यकर्ते नव्हे तर जनतेचे विश्वस्त म्हणून काम करण्यास प्रेरित करील. प्रसिद्ध शिक्षक आणि नागरी सेवा मार्गदर्शक अवध ओझा अकादमीचे प्रमुख असून ते इतिहास आणि प्रेरणादायी विषयांवर एक महिन्याचे विशेष सत्र घेणार आहेत. पतंजली विद्यापीठ परिसरात उभारण्यात येणारी ही पूर्ण निवासी अकादमी सात्त्विक वातावरण, योगाधारित दैनंदिन दिनचर्या, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व पुरस्कार, जागतिक दर्जाच्या सुविधा, क्रीडा संकुल आणि आधुनिक शिक्षण साधने उपलब्ध करून देणार आहे. अकादमीच्या उद्घाटन कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ओमानजवळ भारतीयांची नौका बुडाली! १४ जण बचावले

पान १ वरून

मिळाली. ही घटना अशावेळी घडली आहे, जेव्हा ओमान आणि होर्मुज सामुद्रधुनी परिसरातील सागरी क्षेत्र सुरक्षा आणि सामरिक दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील मानले जात आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे या भागातील जहाजवाहतूक आणि सागरी हालचालींवर परिणाम होत आहे. जगातील सर्वाधिक महत्त्वाच्या सागरी व्यापार मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुज सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात तेल आणि इतर व्यापारी मालाची वाहतूक होते. त्यामुळे या भागातील कोणतीही आपत्कालीन घटना गांभीर्याने घेतली जाते. सुदैवाने, या प्रकरणात सर्व भारतीय नागरिकांची सुरक्षित सुटका करण्यात यश आल्याने मोठी सागरी दुर्घटना टळली आहे. सध्या भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय यंत्रणा संपूर्ण घडामोडींवर लक्ष ठेवून आहेत.

## घाटकोपर-दादरनंतर गिरगावात पांढरे पट्टे! मनसे-गिरगांवकर संतप्त

पान १ वरून

भिंतींच्या आत असावा, सार्वजनिक रस्त्यांवर नाही. प्रत्येकाने आपल्या परंपरा जपाव्यात, पण सार्वजनिक जागांवर त्याचा अतिक्रमणासारखा वापर होता कामा नये. आता या संपूर्ण प्रकरणाची मुंबई महापालिकेने गंभीर दखल घेतली आहे. जी/उत्तर विभागातील विविध रस्त्यांवर अनधिकृतपणे पांढरे पट्टे मारल्याचे निदर्शनास आल्यानंतर महापालिकेने पोलिसांना पत्र पाठवून कारवाईची मागणी केली आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारचे पट्टे मारण्यासाठी कोणालाही परवानगी देण्यात आलेली नाही. अशा कामांसाठी कोणतीही अधिकृत प्रक्रिया अस्तित्वात नसल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

या वादावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कोणत्याही समाजाला एकमेकांसमोर उभे करणे किंवा दोन समाजांत तेढ निर्माण करणे योग्य नाही. प्रत्येक समाजाने आपल्या परंपरा जपाव्यात, पण त्याचवेळी इतरांच्या भावना आणि अधिकारांचाही आदर राखला पाहिजे. आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे परस्पर सन्मान. प्रत्येक विषयाला वादाचे स्वरूप देऊन त्यात राजकारण मिसळल्याने कोणाचाही फायदा होत नाही. काही लोक चर्चेत राहण्यासाठी वेगवेगळ्या गोष्टी करत असतात. त्यातील प्रत्येक गोष्टीला मी बोललंच पाहिजे असे काही नाही.

## भारत आता केवळ ग्राहक नाही तर जगाला उपाय देणारा देश


पान १ वरून

आणि जगासाठी तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित करा, असे आवाहन मोदी यांनी केले. मोदी म्हणाले की, भारत-फ्रान्स भागीदारी ही कनेक्शन आणि कन्विक्शन यांच्यासोबतच नवकल्पना आणि प्रेरणेवर आधारित असल्याचे मोदी यांनी सांगितले. ही भागीदारी केवळ राजनैतिक आणि व्यावसायिक संबंधांपुरती मर्यादित नसून जागतिक समस्यांवर संयुक्तपणे उपाय शोधण्याचे व्यासपीठ बनले आहे. गेल्या १२ वर्षांत भारताने मजबूत नवकल्पना परिसंस्था उभी केली असून, आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम बनला आहे. मानवकेंद्रित तंत्रज्ञान आणि नवकल्पना ही भारताची प्राथमिकता आहे. नवीन नवीन शोध करणे भारताच्या डीएनएमध्ये आहे, भारत वेगाने आणि व्यापक प्रमाणात नवकल्पना करतो. शाश्वत भविष्यासाठी आणि संपूर्ण जगाच्या हितासाठी भारत नवीन कल्पनेचा, ज्ञानाचा किंवा शोधाचा वापर करून लोकांचे जीवनमान उंचावणे, कार्यक्षमता वाढवणे किंवा समस्या सोडवणे यासाठी शोध करत आहे. सुधारणांची ही एक्स्प्रेस थांबणार नाही. स्टार्टअप्सची संख्या आगामी काळात आणखी वाढेल.




नवाकाळ
• मुंबई । सोमवार १५ जून, २०२६ • पान -८

# जांभूळ आणि दुष्काळ



**आमची** आजी म्हणायची की, ज्या उन्हाळ्यात जांभळाचे असे सडे पडतात, त्या वर्षी दुष्काळ असतो. आजीचे पारंपरिक ज्ञान वनस्पतीशास्त्रानुसार वैज्ञानिक आकलन अगदी बरोबर आणि अचूक आहे. विज्ञानात या रंजक आणि तितक्याच धक्कादायक प्रक्रियेला मास्टिंग किंवा स्ट्रेस फ्रुटिंग म्हटले जाते. झाडांनी स्वतःला संपवून जास्तीत जास्त फळे देण्याच्या या शेवटच्या प्रयत्नाला कधीकधी सुसाईड फ्रुटिंग किंवा बंपर क्रॉप देखील म्हणतात.

हे नक्की काय आहे आणि यामागचे विज्ञान काय सांगते, ते आपण सोप्या भाषेत समजून घेऊ.

**१. 'सर्व्हायव्हल इन्स्टिंक्ट' (अस्तित्वाची लढाई)**

प्राध्यापक मॅडम म्हणाल्या त्याप्रमाणे, हा निसर्गाचा जनुके पुढे चालू ठेवण्याचा नियम आहे. जेव्हा झाडाला जमिनीखालून पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागते किंवा हवामानात मोठे बदल होणार असे संकेत मिळतात, तेव्हा झाड बचावात्मक व्यवस्था स्थितीत जाते.

झाडाला जाणीव होते की कदाचित पुढील काळात आपण जगू शकणार नाही. अशा वेळी स्वतःला वाचवण्याऐवजी, आपली प्रजाती पृथ्वीवर टिकून राहावी म्हणून झाड आपली संपूर्ण ऊर्जा 'बिया' (फळे) तयार करण्यासाठी वापरते.

**१. नवीन पाने-फांद्यांवर बंदी**

अशा वर्षात झाड नवीन पालवी फुटणे किंवा फांद्या

**यावर्षी जेवढी जांभळं बाजारात दिसत आहेत तेवढी मी गेल्या तीन दशकात कधी पाहिली नाहीत. जांभळाचे अक्षरशः सडे पडत आहेत. ज्या झाडांना मागच्या वर्षी तुरळक फळे आली होती, ती झाडे देखील जांभळाचा सडा टाकत आहेत. ज्या झाडांना फळे आली होती तिथे सडा पडायला लागलाय. हे नक्की काय चाललंय?**

वाढवणे पूर्णपणे थांबवते. कारण नवीन पानांना जगवण्यासाठी जास्त पाणी आणि अन्न लागते. झाड ती ऊर्जा वाचवून फक्त आणि फक्त जांभळाचे उत्पादन वाढवण्यावर केंद्रित करते. यामुळेच मागच्या वर्षी ज्या झाडांना तुरळक फळे होती, ती झाडेही यंदा फळांनी डवरून गेली आहेत.

**१. आजीचे भाकीत आणि विज्ञान (दुष्काळाचा संबंध)**

आजीचे निरीक्षण अगदी अचूक आहे. कारण वनस्पती हवामानातील बदलांना मानवापेक्षा खूप आधी आणि संवेदनशीलतेने ओळखतात.

जांभळाचे मूळ 'सोटमूळ' असते, जे जमिनीच्या अगदी खोल थरापर्यंत जाते. जेव्हा भूगर्भातील पाण्याची पातळी कमालीची खालावते, तेव्हाच या मुळांना ताण जाणवतो. हा पाण्याचा ताण म्हणजेच येणाऱ्या दुष्काळाचे किंवा कडक उन्हाळ्याचे संकेत असतात. म्हणूनच, ज्या वर्षी उन्हाळ्यात जांभळाचा अभूतपूर्व सडा पडतो, तो निसर्गाचा भविष्यातील कोरड्या कालखंडाचा इशारा असतो.

थोडक्यात सांगायचे तर...

जांभळाचे झाड आत्महत्या करत नाही, तर स्वतःचे बलिदान देऊन आपल्या पुढच्या पिढीला (बियांना) जन्म देण्याचा प्रयत्न करत असते. निसर्गाचे हे चक्र थक्क करणारे आहे. आजींचे पिढ्यान्‌पिढ्यांचे निरीक्षण आणि विज्ञानाची तत्त्वे इथे तंतोतंत जुळून आली आहेत. यंदा जांभळाचा आस्वाद नक्की घ्या, पण निसर्गाने दिलेल्या या 'दुष्काळाच्या' संकेताकडे गांभीर्याने बघून पाणी आणि संसाधनांचा वापर जपून करण्याची गरज आहे, हेच यातून दिसून येते.!

## वर्सोवा-दहिसर कोस्टल रोडची देवेंद्र फडणवीसांकडून पाहणी

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांनी वर्सोवा ते दहिसर दरम्यान सुरू असलेल्या नॉर्थ कोस्टल रोड प्रकल्पाची पाहणी करून कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी प्रकल्पातील स्टील ब्रिज, केबल-स्टेड ब्रिज, डबल डेकर रस्ता, विविध इंटरचेंज आणि कनेक्टरच्या कामांची सविस्तर माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली. तसेच वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी केलेल्या नियोजनाचाही त्यांनी आढावा घेतला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वांद्रे-वर्सोवा सी-लिंक आणि कोस्टल रोड प्रकल्प मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत बदल घडवून आणेल. सध्या सुरू असलेले काम अत्यंत आव्हानात्मक असून, समुद्रातील प्रतिकूल परिस्थितीत आणि मोठ्या लाटांमध्ये काम करणे सोपे नाही. मात्र सर्व अडचणींवर मात करत प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. प्रकल्पासंदर्भातील विविध न्यायालयीन अडथळे दूर करण्यात आले असून, आवश्यक परवानग्याही



मिळाल्या आहेत. त्यामुळे आता कामाला अधिक गती मिळाली आहे. पावसाळ्यानंतर प्रकल्पाच्या कामाला आणखी वेग येईल.

बांद्रा-वर्सोवा सी-लिंकचे काम मार्च २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तर वर्सोवा ते दहिसरदरम्यानचे विविध कनेक्टर्स आणि संबंधित कामे डिसेंबर २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

## पहिला ट्रिलियनर इलॉन मस्कचे राहते घर केवळ ३७५ चौरस फूट

■ ऑस्टिन

**जगातील** पहिला ट्रिलियनर बनण्याचा मान मिळालेल्या इलॉन मस्क यांच्या संपत्तीची जगभर चर्चा सुरू असतानाच त्यांच्या राहणीमानाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. स्पेसएक्सच्या विक्रमी आयपीओनंतर संपत्तीत प्रचंड वाढ होऊनही मस्क टेक्सासमधील स्टारबेस प्रकल्पाजवळ अवघ्या ३७५ चौरस फुटांच्या छोट्याशा घरात राहतात. या जीवनशैलीची जगभर चर्चा रंगली आहे. त्यांची आई मेय मस्क यांनी या घरातील साधेपणाचा उल्लेख करत फ्रिजमध्ये खाण्यासाठी काहीच नव्हते असे सांगितल्याने हा विषय पुन्हा चर्चेत आला.

स्पेसएक्सच्या स्टारबेस प्रकल्पाजवळ असलेल्या या घरात लहानसा हॉल, स्वयंपाकघर, झोपण्याची जागा आणि स्नानगृह अशा मूलभूत सुविधा आहेत. २०२० मध्ये टेक्सासमध्ये स्थलांतर केल्यानंतर मस्कने कॅलिफोर्नियातील बहुतांश मालमत्ता विकल्या होत्या. त्यावेळी त्याने माझ्याकडे स्वतःचे घर असणार नाही अशी घोषणा केली होती. जरी त्यांच्याशी संबंधित



सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कंपन्यांकडे ऑस्टिन परिसरात आलिशान मालमत्ता असल्याचे सांगितले जात असले, तरी मस्क बहुतांश वेळ या छोट्या घरातच घालवतो. तर मेय मस्क यांनी पोस्टमध्ये लिहिले होते की, मुलाच्या घरी राहिल्यानंतर त्यांना फ्रिजमध्ये खाण्यासाठी काहीच नव्हते.

## राज ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त मनसेकडून पेट्रोलवर ५ रुपयांची सूट

■ मुंबई

**मध्य** पूर्वेत अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत असलेल्या संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याचा परिणाम भारतासह अनेक देशांतील इंधन दरांवर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या परिस्थितीत वाढत्या महागाईने त्रस्त झालेल्या सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पेट्रोलवर ५ रुपयांची सवलत दिली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येकी एका पेट्रोल पंपावर दुचाकीस्वारांना पेट्रोलवर प्रति लीटर ५ रुपयांची सवलत देण्यात येत आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर सामान्य नागरिकांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. देशात महागाई सातत्याने वाढत असून, पेट्रोल-डिझेलचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. याच पार्श्वभूमीवर जनतेला मदतीचा हात देण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे मनसेचे नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी सांगितले.

## ॲमेझॉनच्या डेटा सेंटरकडून वर्षभरात ९ अब्ज लीटर पाणी वापर

■ वॉशिंग्टन

**कृत्रिम** बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात झालेल्या क्रांतीबरोबरच जास्तीत जास्त डाटा सेंटरची आवश्यकता भासू लागली आहे. मात्र या डाटा सेंटरना लागणारे प्रचंड पाणी आणि वीज ही एक वेगळीच समस्या ठरू लागली आहे. या क्षेत्रातील प्रसिद्ध कंपनी ॲमेझॉनने दिलेल्या माहितीनुसार जगभरातील आपल्या डेटा सेंटरने २०२५ मध्ये तब्बल ९ अब्ज लीटर पाणी वापरले.

ॲमेझॉनने पहिल्यांदाच ही माहिती जाहीर केली आहे. त्याआधीच्या म्हणजेच २०२४ साली झालेल्या पाण्याच्या वापरात दोन टक्क्यांची घट झाली. डेटा सेंटरची व्याप्ती वाढवूनही पाणी वापराचे प्रमाण कमी झाले, असा दावा ॲमेझॉनने केला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की डेटा सेंटरसाठी मोठ्या प्रमाणात पाणी आणि वीज वापरली जात असल्यामुळे



स्थानिकांमध्ये संताप खदखदत आहे. शेतीचे पाणी डेटा सेंटरकडे वळवल्याचे प्रकारही समोर आले आहेत. विशेष म्हणजे आपल्या प्रतिस्पर्धी कंपन्या मायक्रोसॉफ्ट, गुगल आणि मेटाच्या तुलनेत आपला पाणी वापर कमी असल्याचा दावा ॲमेझॉनने केला आहे.

## तृणमूल खासदार अभिषेक बॅनर्जीची ३ दिवसांत दुसऱ्यांदा सीआयडी चौकशी

■ कोलकाता

**तृणमूल** काँग्रेसचे सरचिटणीस व डायमंड हार्बरचे खासदार अभिषेक बॅनर्जी आज पश्चिम बंगाल विधानसभा विरोधी पक्षनेतेपदासाठी आमदारांच्या स्वाक्षऱ्या बनावट केल्याच्या कथित प्रकरणात दुसऱ्यांदा चौकशीसाठी सीआयडी मुख्यालयात हजर झाले. ११ जूनला झालेल्या चौकशीत मिळालेल्या उत्तरांबाबत तपास यंत्रणा समाधानी नसल्याने त्यांना पुन्हा समन्स बजावण्यात आले असून, त्यांच्याभोवती सीआयडी, ईडीचा फास आवळला गेला आहे. या प्रकरणात तृणमूल काँग्रेसचे आमदार कुणाल घोष



यांनाही चौकशीसाठी बोलावण्यात आले असून, दोघांची समोरासमोर चौकशी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सीआयडीने बॅनर्जी यांना या प्रकरणाशी संबंधित काही महत्त्वाची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले आहे. ६ मे रोजी त्यांच्या कालीघाट येथील निवासस्थानी तृणमूल आमदारांची बैठक झाली होती. त्यावेळी विरोधी पक्षनेतेपदासाठी सोवनदेव यांच्या नावाला बहुतेक आमदारांनी हात वर करून पाठिंबा दर्शविला होता. मात्र त्यानंतर सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांतील स्वाक्षऱ्यांमध्ये विसंगती आढळल्याचा आरोप झाला व त्यातून एफआयआर दाखल होऊन सीआयडी चौकशी सुरू झाली.

## नवी मुंबई पालिकेच्या निमंत्रण पत्रिकेत एकनाथ शिंदेंचे नाव नाही

■ नवी मुंबई

**नवी मुंबई** महापालिकेच्या आरोग्य सेवा कामांच्या लोकार्पण सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे, पालकमंत्री असतानाही शिंदे यांना निमंत्रणात स्थान न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

उद्या नवी मुंबईत होणाऱ्या या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत माजी मंत्री गणेश नाईक, शिंदे गटाचे खासदार नरेश मस्के आणि खासदार श्रीकांत शिंदे यांची नावे समाविष्ट करण्यात आली आहेत. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव नसल्याने विविध तर्क-वितर्कांना वाव मिळत आहे. याआधीही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना निमंत्रण देण्यात आले नव्हते.

## रुग्णांना हॉस्पिटलच्या दुकानातूनच औषधे खरेदीची सक्ती नाही



■ मुंबई

**महाराष्ट्रातील** हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या औषध दुकानांतूनच औषधे खरेदी करण्यास रुग्णांना भाग पाडता येणार नाही, असे राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या नियमाचे पालन करण्याचे निर्देश रुग्णालये, डॉक्टर आणि औषध विक्रेत्यांना देण्यात आले असून, उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

रुग्णांना प्रिस्क्रिप्शन देण्यास नकार देणे किंवा विशिष्ट औषध दुकानातूनच औषधे घेण्याचा आग्रह धरणे याबाबत नागरिकांनी एफडीएकडे तक्रारी कराव्यात, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, काही खासगी रुग्णालयांविरोधात अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. रुग्णालयाच्या आवारातील किंवा त्यांच्याशी संलग्न असलेल्या औषध दुकानांतूनच औषधे घेण्यास रुग्णांना भाग पाडले जात असल्याचे आरोप आहेत.

**उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा**

काही प्रकरणांमध्ये डॉक्टर रुग्णांना प्रिस्क्रिप्शन न देता ते थेट विशिष्ट औषध दुकानांकडे पाठवत असल्याच्याही तक्रारी आल्या आहेत. या तक्रारींची गंभीर दखल घेत एफडीएने निर्देश जारी केले आहेत की डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शनची प्रत रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना देणे बंधनकारक राहील. औषधे कुठून खरेदी करायची याचा अधिकार रुग्णांना असल्याची माहिती रुग्णालयांनी त्यांना द्यावी. रुग्णालयाच्या औषध दुकानातून औषधे घेणे बंधनकारक नाही, याबाबतचे फलक मराठी आणि इंग्रजी भाषेत ठळकपणे लावावेत. एफडीएच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, हा आदेश प्रामुख्याने खासगी रुग्णालये आणि दवाखान्यांमधील अंतर्गत औषध दुकानांवर लागू होतो. मात्र, काही डॉक्टर त्यांच्या दवाखान्याजवळील विशिष्ट औषध दुकानांकडे रुग्णांना वळवतात, त्याबद्दल आदेशात स्पष्ट उपाययोजना नमूद केलेल्या नाहीत.

## जयपूर पोलो मैदानाचा केंद्र सरकारकडे ताबा

■ नवी दिल्ली

**रेस कोर्स** रोड परिसरातील १५.२० एकर क्षेत्रफळाचे जयपूर पोलो मैदान केंद्र सरकारने काल ताब्यात घेतले. हे मैदान दिल्ली जिमखाना क्लबच्या जवळ असून, त्या क्लबलाही यापूर्वी जागा खाली करण्याची नोटीस देण्यात आली होती. केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारीतील एल अँड डीओ म्हणजे भूमी आणि विकास कार्यालय अधिकाऱ्यांनी काल या १५.२० एकर भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा घेतल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या कारवाईपूर्वी २० मे रोजी एल अँड डीओने जागा खाली करण्याचा आदेश जारी केला होता. या आदेशात संबंधित जमीन मोठ्या सार्वजनिक उद्देशासाठी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, या जमिनीचा नेमका कोणत्या उद्देशासाठी वापर केला जाणार आहे, याबाबत कोणतीही माहिती देण्यात आलेली नव्हती. ८ जून रोजी दिल्ली हायकोर्टाने भारतीय पोलो संघटनेच्या याचिकेवर निर्णय घेण्याचे निर्देश जिल्हा न्यायालयाला दिले होते.

## एअर इंडिया इमारतीचे नूतनीकरण

■ मुंबई

**मुंबईतील** ऐतिहासिक एअर इंडिया इमारत महाराष्ट्र शासनाने १,६०१ कोटी रुपयांत अधिकृतपणे विकत घेतली असून आता या इमारतीला नवी झळाळी मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारतीची डागडुजी आणि अंतर्गत सुशोभीकरणासाठी १८१ कोटी रुपये मंजूर केले आहेत. नूतनीकरणाचे हे काम १५ ऑगस्टपासून सुरू होणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे आबासाहेब नागरगोजे यांनी सांगितले की, नरिमन पॉईंट येथील २३ मजली एअर इंडियाची इमारत राज्य सरकारने नुकतीच १६०१ कोटी रुपये मोजून खरेदी केली

**१८१ कोटी खर्च**



आहे. इमारतीची खरेदी प्रक्रिया पूर्ण होऊन इमारत ताब्यात आल्यानंतर सरकारने इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती, नूतनीकरण आणि विद्युतीकरणाच्या कामाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवली आहे. त्यासाठी विभागाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळून वित्त विभागाला निधी मंजूर झाला आहे.

या इमारतीसाठी स्थापत्य आणि विद्युतीकरण अशा दोन स्वतंत्र निविदा काढण्यात येतील. इमारत नूतनीकरणाचे काम ६ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहे. स्थापत्य कामात इमारतीची दुरुस्ती, सजावट, नवे फर्निचर आणि रंगकामाचा समावेश आहे. विद्युतीकरणात नव्या लिफ्ट, विद्युत उपकरणे बसवणे यांचा समावेश असेल.

## नसरापूरच्या अत्याचार प्रकरणात नोंदवली ५३ साक्षीदारांची साक्ष

■ पुणे

**भोर** तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या साडेतीन वर्षांच्या बालिकेवरील अत्याचार व हत्येच्या खटल्याची सुनावणी अंतिम टप्प्यात असून, आतापर्यंत एकूण ५३ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. या जलदगतीने चालणाऱ्या खटल्यात ११०० पानांचे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

या बालिका अत्याचार प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपी भिमराव कांबळे याला अटक केली असून, दररोज सुनावणी होत आहे. त्यामुळे खटल्याचा निकाल महिनाभरात लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

वैद्यकीय पुरावे, वैज्ञानिक माहिती, बाल साक्षीदाराची साक्ष आणि डीएनए प्रोफायलिंग रेकॉर्डवर घेण्यात आले आहेत. उर्वरित सायबर तज्ज्ञ आणि मुख्य तपास अधिकारी यांच्या साक्षी उद्या सोमवार १५ जून रोजी नोंदविणार आहेत. विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी जलद निकालाबाबत विश्वास व्यक्त केला आहे. राज्याच्या इतिहासातील सर्वात वेगाने चाललेल्या खटल्यांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे.१ मे रोजी भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केली होती.

## अयोध्येतील राम मंदिराच्या कर्मचाऱ्याने केली जबरी चोरी

**शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवले १० लाख रुपये**

■ अयोध्या

**अयोध्येतील** राम मंदिराच्या देणगी अपहार प्रकरणी एसआयटीने कर्मचारी लवकुश मिश्राच्या घरातून शेणाच्या ढिगाऱ्याखालील १० लाख रुपये जप्त केले आहेत. १८ हजार पगार असताना त्याने दीड कोटींची जमीन खरेदी केल्याने संशय वाढला आहे. अन्य एका कर्मचाऱ्याचीही चौकशी सुरू आहे. एसआयटीला सात दिवसांत प्राथमिक अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत तसेच त्यांना १५ दिवसांच्या आत अंतिम तपास अहवालही सरकारला सादर करावा लागणार आहे.



राम मंदिरातील देणग्यांच्या अपहार प्रकरणाचे गांभीर्य पाहता ट्रस्टने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडून विशेष तपास पथक नेमले होते. त्यानंतर स्पेशल ऑपरेशन ग्रुपने मंदिरातील कर्मचारी लवकुश मिश्रा याला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. या तपासात मंदिरात आलेल्या देणगीची मोजणी करणारा कर्मचारी लवकुश मिश्रा याच्या घरातून तब्बल १० लाख रोकड जप्त केली आहे. कर्मचारी मीनापूरच्या फगौली गावातील रहिवासी असून, त्याने घरातील कपाटात ढिगाऱ्याखाली रोकड लपवून ठेवली होती. जप्त केलेल्या रकमेबाबत तपास सुरू झाला आहे.

## खान सर अकादमी तोडफोड प्रकरण आरोपीचा नेपाळमध्ये संशयास्पद मृत्यू

■ पाटणा

**पाटणा** येथील खान सर यांच्या खान ग्लोबल स्टडीज गोळीबार प्रकरणातील आरोपी प्रिन्स यादवचा नेपाळमधील विराटनगर येथील हॉटेलमध्ये संशयास्पद मृत्यू झाला. खान ग्लोबल स्टडीज प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकेच्या भीतीने ते नेपाळमध्ये गेल्याचे सांगितले जात होते. हॉटेलमध्ये त्यांचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे.

नेपाळ पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी पाच जणांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे. रोशन आनंद बिहारमधील सहरसा जिल्ह्यातील रहिवासी असून ज्ञान बिंदू अकॅडमीचे संचालक आहेत, तर त्यांचा भाऊ प्रिन्स यादव संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी पाहत असे. काही दिवसांपूर्वी खान सर यांच्या 'खान ग्लोबल स्टडीज' संस्थेशी संबंधित वादानंतर रोशन आनंद आणि प्रिन्स यादव यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात पोलिसांनी रोशन आनंदला अटक केली होती. तर अटकेच्या भीतीने प्रिन्स यादव नेपाळमध्ये गेल्याची माहिती होती. त्याचा मृतदेह हॉटेलमध्ये आढळल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.